POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

# मराठी दैनिक मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२१७ ● मुंबई, रविवार, ९ मार्च २०२५ ● पृष्ठ-४ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA











मिरा भाईंदर दिवाणी न्यायालयाचे उद्घाटन उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत व सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय ओक यांच्या हस्ते पार पडले. याप्रसंगी मा. ना. श्री. प्रताप सरनाईक, परिवहन मंत्री, मा. आमदार नरेंद्र मेहता, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.), मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आलोक आराधे, न्यायाधीश गिरीश कुलकर्णी, अॅड. गौरी गोडसे, ठाणे जिल्हा न्यायाधीश एस.बी. अग्रवाल यांच्यासह इतर प्रमुख मान्यवर उपस्थित होते.


## गजर असेल तरच बाहेर पडा! मुंबई, कोकणात राहणाऱ्यांना इशारा

**■मुंबई। प्रतिनिधी :**

मुंबई, ठाणे आणि रायगड जिल्ह्यामध्ये रविवारी, सोमवार आणि मंगळवारी उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. माजी हवामान अधिकारी कृष्णानंद होसाळीकर यांनी या तिन्ही जिल्ह्यांमध्ये ९, १० आणि ११ मार्च रोजी उष्णतेची लाट येईल, असं सांगितलं आहे. मुंबई, ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील तुरळक ठिकाणी उष्णतेच्या लाटा, तर दक्षिण कोकणातील काही भागांत उष्णतेच्या लाटा येतील, असेही त्यांनी इशारा देताना नमूद केलं आहे.

**४० अंश तापमान नोंदविले जाणार**

मुंबईचे कमाल तापमान शुक्रवारी (७ मार्च रोजी) ३५.८ अंश सेल्सिअस नोंदविण्यात आले. येत्या बुधवारपर्यंत म्हणजेच उष्णतेची लाट येऊन गेल्यानंतर यात आणखी वाढ होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. १२ मार्चपर्यंत मुंबई महानगर प्रदेशात उष्णतेच्या लाटेची शक्यता आहे. पालघर, ठाणे, नवी मुंबई आणि कल्याणमध्ये ४० अंश तापमान नोंदविले



जाईल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. रविवार ते मंगळवारदरम्यान उन्हाचा तडाखा तीव्र असू शकतो, असा अंदाज आहे.

**उष्णतेची लाट म्हणजे काय?**

कोकणात उष्णतेची लाट म्हणजे दिवसाचे कमाल तापमान ३७ अंशांपेक्षा अधिक नोंदविले जाईल.ते त्या दिवसाच्या सरासरी तापमानापेक्षा ४ अंशांनी जास्त असेल. कोकण विभागात चालू आठवड्याच्या सुरुवातीपासूनच उष्णतेचे चटके जाणवत असून पुढील आठवड्याच्या सुरुवातीपर्यंत हे वातावरण कायम असण्याची शक्यता प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे. त्यामुळेच गरज असेल तरच दिवसा बाहेर पडा असं आवाहन करण्यात आलं आहे.

**उष्णता का वाढली आहे?**

पूर्वेकडून येणाऱ्या वाऱ्यांमुळे तापमान आणि आर्द्रतेचे प्रमाण अधिक आहे. याचा परिणाम कोकणातील वातावरणावर झाला असून रविवार, सोमवार आणि मंगळवारी दक्षिण आणि उत्तर कोकण विभागातही तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट जाणवू शकते. कोकण विभागात फेब्रुवारीमध्ये उष्णतेमुळे नागरिक हैराण झालेले असताना हीच परिस्थिती आता मार्चच्या सुरुवातीपासून अनुभवायला लागत आहे.


दक्षिण कोकणात रायगड आणि रत्नागिरीमध्ये शुक्रवार आणि शनिवारी दमट आणि उष्ण वातावरणामुळे वाढलेली अस्वस्थता तर रविवारी आणि सोमवारी उष्णतेची लाट तुरळक ठिकाणी अनुभवायला मिळणार आहे.सिंधुदुर्गातही रविवारी आणि सोमवारी उष्ण आणि दमट वातावरणामुळे त्रास होऊ शकतो. उर्वरित महाराष्ट्रात वातावरण कोरडे असू शकते. उत्तरेकडून येणाऱ्या वाऱ्यांमुळे किमान तापमानाचा पारा खाली उतरला आहे. राज्यात पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ येथे किमान तापमानाचा पारा १० ते १२ अंशांपर्यंतही खाली उतरल्याची गुरुवारी नोंद झाली.

## महाराष्ट्रात औरंगजेबाच्या कबरीवर लाखोंची उधळण

### मात्र छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिराकडे दुर्लक्ष, RTIमधून धक्कादायक माहिती

**■मुंबई। प्रतिनिधी :**

केंद्रीय पुरातत्व विभागाने औरंगजेबाच्या कबरीवर १३ वर्षांत लाखो रुपयांचा खर्च केला आहे... ऐकून तुम्हाला धक्का बसला असेल. आणखी गंभीर मुद्दा यापुढेच आहे. सिंधुदुर्गच्या मालवणमधील छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिरासाठी केवळ काही हजारांचा खर्च करण्यात आला असल्याचं हिंदू जनजागृती संघटनेनं सांगितलं आहे. माहिती अधिकारातून ही धक्कादायक माहिती समोर आली आहे.



महाराष्ट्रातील राज्यकर्ते हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावानं राज्यकारभार चालवतात. मात्र याच राज्यकर्त्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिराकडं लक्ष द्यायला वेळ नाही. शिवरायांच्या किल्ले सिंधुदुर्गावरील मंदिराला सरकारकडून अवघे तीन हजार रुपये अनुदान दिलं जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

दुसरीकडे केंद्र सरकारच्या पुरातत्व विभागाकडून औरंगजेबाच्या संभाजीनगरच्या कबरीवर लाखोंची उधळपट्टी केला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. हिंदू जनजागृती समितीनं माहितीच्या अधिकारात मिळवलेल्या माहितीत १३ वर्षांत साडेसहा लाखांचा खर्च केला आहे. शिवरायांच्या महाराष्ट्रात औरंगजेबाचं उदात्तीकरण केलं जात असल्याचा आरोप हिंदुत्ववादी संघटनेनं केला आहे.

कोट्यवधी रुपये खर्चून शिवरायांच्या स्मारकांचा संकल्प सरकारनं सोडला आहे. मात्र शिवरायांच्या महाराष्ट्रातील मंदिरावर खर्च करण्यात सरकार हात आखडता का घेतं असा सवाल शिवप्रेमींकडून विचारला जात आहे.

## मुंबईत मराठी माणसावर प्रप्रांतीय महिलांचा जीवघेणा हल्ला

**■मुंबई। प्रतिनिधी :**

मुंबईत मराठी भाषेवरुन अनेक वाद होताना आपण पाहतोय. मुंबईत राहून मराठी बोलणार नाही, असे अनेकजण ठणकावून सांगतात. दरम्यान मुंबईत मराठी माणसाला मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आलाय. येथे परप्रांतीय महिलांकडून एका मराठी इसमावर जीवघेणा हल्ला करण्यात आलाय. याबद्दल सविस्तर जाणून घेऊया.

मुंबईत एका मराठी व्यक्तीवर परप्रांतीय महिलांनी हल्ला केलाय. जुन्या वादातून या महिलांनी मराठी माणसाच्या डोक्यात फरशी



मारलीये. शुक्रवारी हा प्रकार घडला. अमृत निकम या ४८ वर्षीय इसमावर जीवघेणा हल्ला झाला. पूर्वीच्या भांडणातून निकम यांच्या डोक्यात फरशी मारल्याचे सांगितले जात आहे. मारहाणीत अमृत निकम आणि त्यांची पत्नी आशा निकम जखमी झाल्या. घटना सीसीटीव्हीत कॅमेऱ्यात कैद झाल्यानंतर पोलिसांना गुन्हा दाखल केलाय.

या फरशीचा वार इतका जोरात होता की फरशी डोक्यात पडल्यावर अमृत निकम जागीच हलायला लागले. या मारहाणीची दृश्य सीसीटीव्हीत चित्रित झाली आहेत. याप्रकरणी पोलिसांनी हल्ला करणाऱ्या दोन्ही महिलांविरोधात हत्येचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केलाय.

## बंद कंटेनरला कारची जोरदार धडक

### पुणे-बंगळुरु राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघात




**■सातारा। प्रतिनिधी :**

पुणे-बंगळुरु राष्ट्रीय महामार्गावर पाचवड गावच्या हद्दीत भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. बंद पडलेल्या कंटेनरला साताऱ्याहून पुण्याच्या दिशेने निघालेल्या भरधाव इनोव्हा कारने जोरदार धडक दिली आहे. यामध्ये या कारमधील दोन महिलांचा जागीच मृत्यू झाला आहे. सलमा मोमीन आणि महिदा शेख अशी मृत्यू झालेल्या महिलांची नावे असून या घटनेत दोन जण गंभीर जखमी झाले आहेत.

दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच भुईंज पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत. जखमींना तात्काळ शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. दोन्ही मृतदेह पोलिसांनी शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात हलवले आहेत. या अपघाताची नोंद भुईंज पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## नागपुरातील अत्यंत वर्दळीच्या रामनगर चौकात दिवसाढवळ्या हत्या

### आरोपी फरार, किरकोळ वाद विकोपाला

**■कोल्हापूर। प्रतिनिधी :**

नागपूरातून एक मोठी बातमी समोर आली असून शहरातील रामनगर चौकात हत्येची घटना घडली आहे. अत्यंत वर्दळीच्या रामनगर चौकात भर दुपारी हत्येची घटना घडल्यामुळे सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठत पुढील तपास सुरू केलाय. पुढे आलेल्या माहितीनुसार, विशाल निकोसे असे मृतकाचे नाव असून तो रामनगर चौकात रस्त्याच्या कडेला मेकॅनिक म्हणून दुकान चालवायचा.

दरम्यान, जवळच भाजीचे दुकान लावणाऱ्या आरोपी सोबत त्याचा गेले अनेक दिवस वाद होत. आज ही दोघांमध्ये शाब्दिक वाद झाला आणि त्याच्यातूनच हत्येची ही घटना घडली असल्याचे



समोर आले आहे. सध्या पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून आरोपी भाजीवाला फरार झाला आहे. पोलिसांनी हत्या करण्यासाठी वापरण्यात आलेली लोखंडी रॉड जप्त केली आहे. यावेळी घटनास्थळी मोठ्याप्रमाणात रक्त सांडल्याचे दिसून आलं आहे. दुसरीकडे शहरातील अतिशय वर्दळीच्या आणि मुख्य रस्त्यावर भर दुपारी हत्येची घटना घडल्याने परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## महिला दिनीच पोलीस कर्मचाऱ्याकडून महिलेवर अत्याचार

**■बीड। प्रतिनिधी :**

एकीकडे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा होत असतानाच बीडमध्ये धक्कादायक घटना घडली आहे. एका महिलेवर अत्याचार झाला आहे. बीडमध्ये पोलीस कर्मचाऱ्यानेच महिलेवर अत्याचार केला आहे. या घटनेमुळे महाराष्ट्र हादरला आहे. पिडीत महिलेच्या तक्रारीवरुन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

बीडच्या पाटोदा शहरात ही धक्कादायक घटना घडली आहे. जागतिक महिला दिनीच पोलीस कर्मचाऱ्याकडून महिलेवर अत्याचार करण्यात आला आहे. पुण्याहून बीडला येणाऱ्या महिलेला पाटोदा येथेच बसमधून उतरवण्यात आले. यानंतर ही महिला पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी गेली असता तिच्यासह अत्यंत धक्कादायक घटना घडली.



पीडित महिला पाटोदा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी गेली होती. यावेळी येथे कार्यरत असलेला पोलिस कर्मचारी उद्धव गडकर यांनी विनयभंग केल्याची तक्रार पीडित महिलेले केली आहे. आरोपी पोलिस कर्मचारी उद्धव गडकर विरोधात गुन्हा दाखल करण्यात आले नाही. मात्र, अद्याप ओारपीला अटक करण्यात आलेली नाही.

नवी मुंबईत भंगार वेचक महिलेवर लैंगिक अत्याचार करणा-याला वाशी पोलिसांनी अटक केलीय. पीडित महिलेच्या मदतीने आरोपीचे रेखाचित्र काढून त्याचा शोध घेण्यात आला. दरम्यान कोपरखैरणे पोलीस ठाण्यात अत्याचाराच्या प्रकरणात अटक आरोपीचा चेहरा रेखाचित्राशी जुळत असल्याची माहिती मिळाली होती.

लातूरमध्ये बाप लेकीच्या नात्याला काळीमा फासणारी घटना घडलीय. पोटच्या मुलीवर बापाने अत्याचार करण्याचा प्रयत्न केलाय. आईच्या फियार्दीवरून नराधम बापाला अटक करण्यात आलीय.

गडचिरोलीच्या भामरागडमध्ये मुख्याध्यापकाने विद्यार्थिनीवर लैंगिक अत्याचार केलाय. दरम्यान पालकांच्या तक्रारीनंतर नराधम मुख्याध्यापक रवींद्र गव्हारेला पोलिसांनी अटक केलीय.

### नोकरीचे आमिष दाखवून गंडा

दरम्यान, परिचय असल्याचा फायदा घेत संशयित कुटुंबाने एका व्यक्तिकडून उपचाराच्या नावे सात लाख रुपये उकळले असता, ते परत मागितल्यानंतर संशयितांनी या व्यक्तिच्या नातलगास रेल्वेत नोकरीचे आमिष दाखवून पुन्हा सात लाख रुपये घेत तब्बल चौदा लाख रुपये घेऊन गंडा घातला आहे. या प्रकरणी संशयित राहुल सुधीर गांगुर्डे, सुधीर गेणूजी गांगुर्डे व निलम राहुल गांगुर्डे या संशयितांवर गंगापूर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुनील शंकर कदम (४०, रा. सिरीन मेडॉज, गंगापूर रोड, नाशिक) यांनी फिर्याद नोंदविली आहे. १ सप्टेंबर २०२२ ते एप्रिल २०२३ पर्यंत सम्राट ट्रॉपिकानो येथे असताना वरील संशयितांनी ओळख असल्याचा फायदा घेऊन त्यांच्याकडून औषधोपचारार्थ सात लाख रुपये घेतले. कालांतराने हे पैसे कदम यांनी परत मागितले असता संशयितांनी पैसे परत न करता, कदम यांना त्यांचा शालक निशांत तायडे यांना रेल्वेत नोकरी लावून देतो असे सांगितले. त्यासाठी पुन्हा सात लाख रुपये घेतले. मात्र, मागील सात लाख रुपये व नोकरीदेखील मिळाली नसल्याने त्यांनी पोलीस ठाणे गाठून तक्रार नोंदविली आहे.

## नाशकात जुन्या भांडणाचा राग काढला!

### टोळक्याने धारदार शस्त्रानं सपासप वार करत एकाला संपवलं

**■मुंबई। प्रतिनिधी :**

गेल्या काही दिवसांपासून नाशिक शहरात गुन्हेगारीच्या घटनेत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. आता पुन्हा एकदा नाशिक शहर खुनाच्या घटनेने हादरले आहे. संत कबीरनगर येथे शनिवारी (दि. ०८) रात्री एकाची धारदार शस्त्राने हत्या करण्यात आली आहे. अरुण बंडी असे मयताचे नाव आहे. या प्रकरणी गंगापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, अरुण बंडी याचे काही युवकांसोबत जुने वाद होते. त्याला शनिवारी रात्री चार जणांच्या टोळक्याने अडवून त्याच्यावर धारदार शस्त्राने हल्ला केला. या हल्ल्यात तो गंभीर जखमी झाल्याने त्याचा मृत्यू झाला आहे. घटनेची माहिती मिळताच दंगा पथक तसेच पोलीस घटनास्थळी दाखल झाले.

या घटनेनंतर परिसरात तणाव निर्माण झाला होता. शनिवारी रात्री याबाबत गंगापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गंगापूर पोलिसांनी रात्री दोन हल्लेखोरांना ताब्यात घेतल्याची माहिती समोर येत असून फरार संशयितांचा शोध घेतला जात आहे. मारेकरी सराईत गुन्हेगार असल्याची माहिती समोर येत आहे. दरम्यान, शहरात गेल्या काही दिवसांपासून टोळक्यांचा मोठा सुळसुळाट झाला असून, पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### २ बांग्लादेशी महिलांसह २ आश्रयदात्यांना अटक

कल्याण पूर्वेतील मलंग रस्ता भागातील आडिवली ढोकळी भागात काका ढाब्याजवळील दोन गृहसंकुलातून उल्हासनगर गुन्हे शाखेच्या पथकाने दोन बांग्लादेशी महिला आणि या महिलांना आश्रय देणाऱ्या दोन नागरिकांना गुरुवारी अटक केली. पारपत्र, व्हिसा जवळ नसताना त्या भारतात बेकायदा राहत असल्याचे निष्पन्न झाल्याने उल्हासनगर गुन्हे शाखेच्या पथकाने या महिलांना आणि त्यांना आश्रय देणाऱ्या नागरिकांना अटक केली. फरजाना शिरागुल शेख (३६, रा. चांदुरे, जिल्हा सातखिरा, बांग्लादेश), बिथी उर्फ प्रिया नूरइस्लाम अख्तर (२४, रा. गुलीस्तान, जि. ढाका, बांग्लादेश) अशी अटक करण्यात आलेल्या बांग्लादेशी महिलांची नावे आहेत. या महिला कल्याण पूर्वेतील आडिवली ढोकळी गावातील काका ढाब्या जवळील राजाराम पाटील नगर मधील साईयोग रेसिडेन्सी, गणेशनगर मधील स्वस्तिक विहार इमारतीत राहत होत्या. साईयोग रेसिडेन्सीमध्ये फरजाना शेख यांना ताहीर मुनीर अहमद खान (३५), प्रिया अख्तर यांना गणेश चंद्रा दास (३७) यांनी स्वस्तिक विहार इमारतीत आश्रय दिला होता. कल्याण पूर्वेतील काका ढाबा परिसरात दोन बांग्लादेशी महिला भारतात वास्तव्याचे पारपत्र, व्हिसा यांच्याविना राहत असल्याची गुप्त माहिती उल्हासनगर गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली होती. पथकाने गुरुवारी या बांग्लादेशी महिला राहत असलेल्या इमारतीत छापा टाकून त्यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे भारतात निवासाचे पारपत्र, व्हिसाची मागणी केली. त्यांच्याकडे कोणतीही कागदपत्रे आढळून आली नाहीत. या महिलांना ताहीर खान, गणेश दास आश्रय देत असल्याचे पोलिसांना आढळले.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# पाकिस्तानच्या उलट्या बोंबा!

भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी लंडनमध्ये पाकिस्तानी पत्रकाराला उत्तर देताना पाकव्याप्त काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग होता, आहे आणि नेहमीच राहील, असे ठणकावून सांगितले. पाकिस्तानने चोरलेला तो भाग भारतात आला की तिथे शांतता नांदेल, असे सांगितले. त्यावर पाकिस्तानने उलट्या बोंबा मारायला सुरुवात केली आहे. जयशंकर यांनी पाकव्याप्त काश्मीरच्या प्रश्नावर ज्या आक्रमकपणे हे विधान केले, ते ऐकून पाकिस्तानचा चांगलाच तिळपापड झाला आहे. जयशंकर यांचे म्हणणे पूर्णपणे निराधार असल्याचे म्हणत पाकिस्तानने पुन्हा गळा काढायला सुरुवात केली. त्यामुळे जागतिक पातळीवर पुन्हा एकदा भारत-पाकिस्तानमधील वादग्रस्त काश्मीरचा मुद्दा चर्चेत आला. २०१९ पासून एस. जयशंकर भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाची धुरा वाहत आहेत. अत्यंत हुशार, चाणाक्ष आणि अभ्यासू पण तेवढेच आक्रमक परराष्ट्रमंत्री म्हणून एस. जयशंकर यांनी मागच्या ६ वर्षांत आंतरराष्ट्रीय पातळीवर आपली प्रतिमा निर्माण केली आहे. परराष्ट्रमंत्री होण्याआधी ते भारताचे परराष्ट्र सचिव होते. एवढेच नाही तर अमेरिका, चीनसारख्या राजनैतिकदृष्ट्या आव्हानात्मक आणि तितक्याच महत्त्वाच्या देशांत भारताचे राजदूत म्हणून काम करण्याचा त्यांचा दांडगा अनुभव आहे. केंद्र सरकारने दिलेल्या जबाबदाऱ्या त्यांनी आतापर्यंत चोख बजावल्या आहेत. अगदी अटीतटीच्या काळातही त्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताची बाजू समर्थपणे लढवली आहे. युक्रेन-रशिया युद्धामुळे संपूर्ण जगाने रशियावर आर्थिक निर्बंध लादलेले असताना भारताने रशियासोबतच्या व्यापारात खंड पडू दिला नाही. यावरून युरोपियन देश, अमेरिका प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे भारताला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा प्रयत्न करीत होते. तेव्हा एस. जयशंकर यांनी रशियाकडून आलेले कच्चे तेल आणि नैसर्गिक वायू वापरूनच युरोपच्या घरात दिवाबत्ती पेटत असल्याचे म्हणत खडे बोल सुनावले होते. एवढ्यावरच न थांबता अमेरिकेच्या इशाऱ्यानंतरही भारताने रशियासोबत एस ४०० एअर डिफेन्स सिस्टम खरेदीचा करार तर केलाच, पण सोबतीलाच तेजस एमकेआय फायटर जेटसाठी अमेरिकेच्याच जीई कंपनीबरोबर इंजिन खरेदीचा करारही बायडेन सरकारच्या नाकावर टिच्चून करून दाखवला. मालदिवसारखा इवलासा देश सत्तापालटानंतर चीनच्या प्रभावाखाली येऊन भारतासोबतचे संबंध बिघडवू पाहत होता. तेव्हा एस. जयशंकर यांनीच डोके शांत ठेवून मालदिवचेही डोके ठिकाणावर आणले. याचप्रकारे आधी श्रीलंका आणि आता बांगलादेशला त्यांची जागा दाखवताना ते दिसतात. खलिस्तानी समर्थक हरदीपसिंग निज्जरच्या हत्येवरून कॅनडाचे पंतप्रधान जस्टीन ट्रूडोने आरोप करीत भारताला भंडावून सोडले होते. तत्कालीन बायडेन सरकारनेही ट्रूडो यांची साथ दिल्यामुळे भारत अडचणीत आला होता. देशांतर्गत राजकीय स्वार्थासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताची प्रतिमा मलिन करण्याचे ट्रूडो यांचे प्रयत्न सुरू असताना त्यांच्याच साम्राज्याला अलगद सुरूंग लागला. कॅनडा सरकारच्या एका संस्थेने एक अहवाल जारी करीत ट्रूडोंचे आरोप निराधार ठरवले आणि भारतालाही क्लीन चिट देऊन टाकली. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर आणि भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल ही जोडगोळी पडद्यामागे हालचाली करण्यात माहीर आहे. अगदी याचप्रमाणे दोन दिवसांपूर्वी एस. जयशंकर यांनी पाकिस्तानला हलकेच टाचणी टोचली. एस जयशंकर हे सध्या ब्रिटन आणि आयर्लंड दौऱ्यावर आहेत. येथे ते अनेक नेत्यांच्या भेटीगाठी घेत असून काही कार्यक्रमांमध्ये सहभागी होत आहेत. त्यातच जयशंकर लंडनच्या थिंक टँक चॅथम हाऊस येथे आयोजित एका चर्चासत्रात सहभागी झाले होते. या कार्यक्रमात त्यांना काश्मीरमध्ये शांतता केव्हा नांदेल, असा प्रश्न विचारण्यात आला. अनेकदा आंतरराष्ट्रीय पातळीवर काही अजेंडे ठरवून असे प्रश्न विचारले जातात. राजनैतिक अधिकाऱ्याला अडचणीत आणणे किंवा त्याला एखाद्या विषयावर भूमिका घेण्यास भाग पाडणे हा त्यामागचा उद्देश असतो. त्याचप्रमाणे काश्मीरच्या प्रश्नावर एस. जयशंकर यांनी अत्यंत तिखट शब्दांत उत्तर दिले. त्यामुळे पाकिस्तानचा जळफळाट तर झालाच पण संपूर्ण जगाच्याही भुवया उंचावल्या. जम्मू-काश्मीरमध्ये शांतता निर्माण करण्यासाठी आम्ही तीन टप्प्यांचा कार्यक्रम आखला आहे. त्यातील अर्ध्याहून अधिक काम पूर्ण झाले आहे. पहिल्या टप्प्यात आम्ही कलम ३७० हटवले. दुसऱ्या टप्प्यात काश्मीरमध्ये विकास व आर्थिक उलाढाल वाढवण्यासह सामाजिक न्याय बहाल करण्याची प्रक्रिया चालू आहे. तिसऱ्या टप्प्यात काश्मीरमध्ये मतदानाचे प्रमाण वाढवून लोकशाही अधिक बळकट करण्याचे काम केले जात आहे. आता पाकिस्तानने चोरलेला भारताचा भाग अर्थात पाकव्याप्त काश्मीर भारताला परत दिल्यानंतरच जम्मू-काश्मीरमध्ये शांतता निर्माण होईल, असे जयशंकर सर्व नेत्यांसमोर अगदी रोखठोकपणे म्हणाले. आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर सर्वसाधारणपणे डिप्लोमॅटीक उत्तर दिले जाते, पण यावेळी जयशंकर यांची देहबोली करारा जबाब मिलेगा अशीच होती. या कार्यक्रमानंतर काही खलिस्तान समर्थकांनी लंडनमध्ये जयशंकर यांची कार अडवून घोषणाबाजी केली. जयशंकर यांच्यासाठी अर्थातच हे नवीन नाही. भारतातही विरोधकांकडून केंद्र सरकार पाकव्याप्त काश्मीर परत कधी आणणार, चीनने बळकावलेल्या लडाखमधील भागाचे काय, असे प्रश्न उपस्थित केले जाऊ लागलेत. जयशंकर यांनी पाकिस्तानला खडे बोल सुनावताना केलेल्या वक्तव्यामुळे कुणाला मिरच्या झोंबल्या असतील तर त्यावर ज्याने त्यानेच इलाज करावा.

# रोजगारात महिलांचा टक्का वाढला पण त्यासाठी किंमत कोणी मोजली?

‘ग्रामीण महिलांचा एकंदर श्रमशक्तीमधील सहभाग २०१७-१८ पासून सातत्याने वाढतो आहे. यापैकी अनेक महिला स्वयंरोजगार करत आहेत’ असे गेल्या काही वर्षांत खासकरून महिलादिनासारख्या प्रसंगी आवर्जून सांगितले जाते, त्याला आकडेवारीचा आधारही असतो. भारत सरकारच्या केंद्रीय सांख्यिकी विभागातर्फे वेळोवेळी श्रम-बल सर्वेक्षणांचे निष्कर्ष प्रकाशित केले जातात, त्यानुसार अगदी यंदासुद्धा देशाच्या श्रमशक्तीत ग्रामीण महिलांचा वाटा वाढलेलाच आहे. अनेक महिला घरगुती स्वरूपाचा उद्योग करत असतात, त्यामुळे त्या स्वयंरोजगारित असतात हेही खरे. पण याचा अर्थ, कमाईसाठी या स्त्रियांना घरकाम व इतर कामे सांभाळून वेळ काढावा लागतो. कुठून मिळवतात ग्रामीण महिला हा वेळ? आणि मग त्यांना स्वतःसाठी काही वेळ उरतो का?

सरकारच्या याच सांख्यिकी विभागातर्फे एक ‘वेळ-विनियोग सर्वेक्षण’ २०१९ मध्ये केले गेले होते, त्यात स्त्रियांचा सर्वाधिक वेळ स्वयंपाक करण्यातच जातो, हेच स्पष्ट झालेले होते. आम्ही इंदूरलगतच्या ग्रामीण भागात ३००० महिलांचे सखोल सर्वेक्षण केले, दिवसाचे २४ तास त्या कायकाय करतात याविषयीचा शोध घेतला, त्यातून प्रमुख निष्कर्ष असा निघाला की, ग्रामीण महिलांना दर आठवड्याचे ६० तास घरकामातच घालवावे लागतात, त्यापैकी बराचसा भाग (किमान ४० तास) हा स्वयंपाकात किंवा एकंदर ‘रांधा-वाढा- उष्टी काढा’ यातच जातो. याचा अर्थ दिवसाला कमीत कमी चार तास, म्हणजे एखाद्या ह्यपार्ट टाइम जॉबह्णच्या इतकाच वेळ. त्यातही, यापैकी ७५ टक्के महिलांना स्वयंपाकासाठी शेण्या बनवून वाळत घालण्याचे किंवा लाकूडफाटा जमवण्याचे कामही करावेच लागते. यामुळे स्वयंपाकाचा आणि चुलीच्या सफाईचाही वेळ वाढतो, शिवाय फुफ्फुसाचे आजारही होतात.

‘प्रधान मंत्री उज्ज्वला योजना’ २०१६ लागू झाल्यानंतर इतक्या वर्षांनीही या महिलांना लाकूडफाटाच जमवावा लागतो आहे आणि धुराच्या चुलीवरच स्वयंपाक रांधावा लागतो आहे, हा झाला एक भाग. पण



उज्ज्वला योजनेमुळे स्वयंपाकाचा वेळ वाचून ग्रामीण महिलांना कमाईकडे वळता आले, असे काही झालेले दिसत नाही...

अशा चुलीवरच्या स्वयंपाकात बऱ्याचदा एकाच घरच्या अनेक स्त्रिया (सासू-सून, भावजयी इत्यादी) गुंतलेल्या राहातात. यापैकी प्रमुख भूमिकेत असलेल्या महिलांनाच ‘आत्ता जे जेवण रांधले त्याला किती वेळ लागला’ असा प्रश्न आमच्या सर्वेक्षणात विचारला गेला. उत्तरदात्यांमध्ये काही जणी गॅस वापरणाऱ्याही होत्या. त्यांच्या उत्तरांमधून असे स्पष्ट झाले की, जेवणाचे पदार्थ फक्त रांधण्यासाठीचा वेळ गॅसपेक्षा चुलीवर किमान ३० मिनिटे अधिक असतो.

चूल वापरणाऱ्या बहुतेक महिलांचा कल शेणाच्या गोवऱ्यांवर स्वयंपाक करण्याकडे दिसला. या गोवऱ्यांसाठी शेण उचण्यापासून ते गोवऱ्या थापण्या- काढण्यापर्यंतच्या कामासाठी आठवड्याला या महिलांची किमान ७० मिनिटे खर्ची पडतात. लाकूडफाटा जमवण्याचे काम आठवड्यातून एखादेवेळी, किंवा महिन्यातून चारदा आम्ही करतो, असे या महिलांनी सांगितले. त्यात ६० मिनिटे तरी जातात. भांडी घासण्याचे कामही करावे लागते आणि त्यात किमान दहा मिनिटे जातात, असे सर्वच उत्तरदात्या महिलांनी सांगितले. थोडक्यात, एलपीजी गॅसवर स्वयंपाक करणाऱ्या महिलांना दररोज किमान २० मिनिटांचा वेळ (आठवड्याला सव्वादोन तास) तरी अधिक मिळतो.

पण म्हणून, एलपीजी वापरणाऱ्या स्त्रियांना कमाईसाठी अधिक वेळ मिळतो आणि त्या कमाई (कुठेतरी कामाला जाऊन किंवा स्वतःचा व्यवसाय करून) वाढवताहेत, असे होते का? तेही नाही. घरात गॅस आहे म्हणून कमाई वाढली का, यावर सर्वजणींचा नकारच होता. एलपीजी गॅस वापरणे या महिलांना उपयुक्त ठरले हे खरे आहेच. पण म्हणून त्यांची कमाईसुद्धा वाढली आणि पर्यायाने राष्ट्रीय श्रमशक्तीमधले महिलांचे योगदान त्या वाढवू शकल्या, असे काही झालेले नाही. याची कारणे काय असावीत?

एकतर, लाकूडफाटा किंवा गोवऱ्या वापरणाऱ्या महिलांपेक्षा वेळ वाचला, तरी एलपीजी गॅसवर स्वयंपाक करण्याचे काम या महिलांना करावे लागतेच. हा स्वयंपाक कोणत्या वेळी करायचा, हे घरचे (पुरुष) ठरवणार, त्यामुळे कमाई करून देणाऱ्या उत्पादक कामासाठी या ग्रामीण महिलांना सलग वेळ मिळत नाही. ज्यांना (गॅस घरी असल्याने) थोडाफार वेळ मिळतो, त्याही तो वेळ पुन्हा कामात न घालवता जरा आराम करतात. एकंदर, आमच्या सर्वेक्षणातील कोणत्याही ग्रामीण महिलेला पूर्णवेळ नोकरी अथवा व्यवसायाची कल्पनासुद्धा करता येऊ नये, इतका घरकामाचा बोजा प्रत्येकीवर आहे.

म्हणजे रोजगार मिळवायचा तो अर्धवेळ किंवा किरकोळ शेतमजुरीसारखी कामे करूनच. या कामांसाठी ग्रामीण भागात महिलांना आजदेखील पुरुषांपेक्षा कमी रोजगार दिला जातो. अंगमेहनतीची कामे बायकांना जमणार नाहीत, म्हणून हा भेदभाव. अशात एखादीने रोजगारासाठी दिवसाला अर्धा तास जास्त काम केलेच, तरीही फार फार तर पाच टक्क्याने तिची कमाई वाढते, असा निष्कर्ष या स्त्रियांच्या अनुभवांआधारे निघाला.

‘मी शेतकरी आहे’ असे सांगणाऱ्या महिला फक्त १५ टक्के होत्या. ८५ टक्के शेतीधंदा पुरुषांकडेच, घरच्या शेतीसाठी घरच्याच बायका राबल्यास त्यांना मजुरी दिली जात नाही. यापैकी काही महिला इतरांच्याही शेतात राबतात आणि मजुरी मिळवतात. मात्र उत्पादक उद्योगसंस्था किंवा सेवा क्षेत्रातील ‘नोकऱ्यां’शी या (मध्य प्रदेशातील) ग्रामीण महिलांचा संबंध नाही.

एलपीजीचा वापर वाढवणे, त्यासाठी पुरेशा सवलती देणे हे ग्रामीण वा शहरी गरीब महिलांच्या आरोग्यासाठी लाभदायक आहेच. पण त्यामुळे कमाईसाठी देता येणारा वेळ किंवा कमाई वाढू शकेल, या अपेक्षेला काहीही आधार सध्या तरी नाही. ताज्या (२०२४) वेळ-वापर सर्वेक्षणातील सरकारी आकडेवारीनुसार ‘२०१९ च्या तुलनेत महिलांच्या एकूण रोजगारात १.५ टक्के वाढ झाली आणि कमाई करून देणाऱ्या कामांसाठी महिलांना २४ मिनिटे अधिक मिळाली, असे दावे करण्यात आले आहेत. २०१७-१८ ते २०२३-२४ दरम्यान महिलांच्या स्वयंरोजगारात २० टक्क्यांनी वाढ झाली असेही सरकारी आकडेवारी सांगते. पण त्यामागची कारणे स्पष्ट करण्यात आलेली नाहीत. त्यामुळेच प्रश्न कायम राहातो. ग्रामीण महिलांना कमाईसाठी वेळ कुठून मिळतो? की, ग्रामीण महिलांपैकी ज्या कमाई करताहेत, त्यांनाच त्याची किंमतही (स्वतःसाठी वेळच न देता, स्वतःची आबाळ करून) मोजावी लागत आहे? नेमक्या उत्तरासाठी सरकारकडून सध्या होत असते त्यापेक्षा अधिक सखोल अशा सर्वेक्षणाची गरज आहे.

# इतिहासावरील वरवंटा

‘समाजाला इतिहासाचे विस्मरण होते, त्या समाजाचे भवितव्य धोक्यात येते,’ हा सुविचार ठीकच. पण त्यासोबत, ‘जो समाज सतत इतिहासातच डोके खुपसून बसलेला असतो, त्या समाजाचेही भवितव्य धोक्यात असते,’ याचीही खूणगाठ मनाशी बांधलेली बरी. हा मुद्दा मांडण्याचे ताजे निमित्त म्हणजे बांगलादेशातील नव्या घडामोडी. शेख हसीना यांचे सरकार गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात उलथून टाकण्यात आल्यानंतर त्या देशाचे जनक, राष्ट्रपिता शेख मुजिबूर रहमान यांच्या सगळ्या स्मृतींवर वरवंटा फिरवण्याचे उद्योग सरकारी पातळीवर सुरू आहेत. बांगलादेशच्या चलनी नोटांवरील मुजीबुर यांचे छायाचित्र हटविण्याचा निर्णय गेल्या वर्षी झाला होता. आता, देशातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक क्रमिक पुस्तकांतून मुजिबूर यांच्या कर्तृत्वतपशिलास कात्री लावण्याचा निर्णय झालेला आहे. या निर्णयामुळे एकूण ४४१ क्रमिक पुस्तकांतील इतिहासाचा अभ्यासक्रम काही प्रमाणात गाळला जाईल, काही प्रमाणात पुन्हा लिहिला जाईल. ‘मुजिबूर रहमान यांनी देशाच्या स्वातंत्र्याची घोषणा केली,’ असा इतिहास आजवर बांगलादेशी विद्यार्थी शिकले; तिथे आता झिया उर रहमान यांचे नाव येईल. हे झिया उर रहमान म्हणजे कोण? शेख हसीना यांच्या कट्टर विरोधक, खालिदा झिया यांचे ते पती! या खालिदा झिया सध्या रोज भारताच्या नावाने आणि शेख हसीना यांच्या नावाने बोटे मोडत असतात. बांगलादेशच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचे, मुजिबूर रहमान यांचे भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यासोबतचे छायाचित्र हे ऐतिहासिक स्वरूपाचे आहे. हे छायाचित्रही आता इतिहासजमा होईल. ‘अतिरंजित, अवास्तव इतिहास गाळण्यासाठी, विद्यार्थ्यांनी ‘खरा इतिहास’ शिकावा, यासाठी हे सारे सुरू आहेस’ असे या पुनर्लेखनाच्या कर्त्याधर्त्यांचे म्हणणे. ही गाळणी नि चाळणी शुद्ध राजकारणापोटी सुरू आहे, हे शेंबडे पोरही सांगू शकेल. जे जे म्हणून मुजिबूर यांच्याशी निगडित आहे ते पुसून टाकायचे हे त्यामागील धोरण. अशा धोरणास उग्र राष्ट्रवादाची फोडणी दिली की समाजमनही रंगांधळे होते.

# ‘तुमच्या डोळ्यांची मला भीती, खाली बघून चालू किती’

पुण्याच्या स्वारगेट बसस्थानकातील बसमध्ये घडलेले बलात्काराचे प्रकरण ताजे असताना जळगाव जिल्ह्यात मुक्ताईनगरमधील कोथळी गावात केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांच्या अल्पवयीन मुलीची गुंडांनी छेडछाड केल्याचे समोर आले. रक्षा खडसे यांनी मुलीसोबत जाऊन तक्रार तर नोंदवलीच, शिवाय ‘मंत्र्यांच्या मुलीच्या बाबतीत असे घडत असेल तर बाकीच्या मुली किती असुरक्षित असतील याचा तर आपण विचारच करू शकत नाही,’ अशी परखड प्रतिक्रिया दिल्यामुळे हे प्रकरण केवळ त्यांच्या मुलीपुरतेच नव्हे तर तिच्यासारख्या शाळा-कॉलेजांत जाणाऱ्या लाखो मुलींशी संबंधित असल्याचे अधोरेखित झाले.

२८ फेब्रुवारीला मुक्ताबाईच्या यात्रेत खडसे यांची मुलगी तिच्या मैत्रिणींसह गेली असताना टवाळखोर गुंडांच्या टोळीने मुलींचा पाठलाग केला. मुलींचे निर्लज्जपणे चित्रीकरण करण्यापर्यंत त्यांची मजल गेली. मुलींसोबत असलेल्या सुरक्षारक्षकाने विरोध करायचा प्रयत्न केला तेव्हा त्याला धक्काबुक्की करण्यात आल्याचे खडसे यांनी तक्रारीत नोंदवले आहे. मुलींसाठी शाळा-कॉलेजाच्या वाटा, प्रवास, सार्वजनिक ठिकाणे सुरक्षित नाहीत. टोळकी करून मुलींचा पाठलाग, अश्लील शेरेबाजी, त्यांचे फोटो, चित्रीकरण करून ते व्हायरल करणे असे नीच प्रकार, गावे, शहरे, महानगरे अशा सर्व ठिकाणी नेहमीची बाब झाली आहे. मुली शक्यतो हे घरापर्यंत नेत नाहीत, कारण पालक सगळा दोष त्यांच्यावर टाकण्याची शक्यता असते. हे मौन गुंडांना प्रोत्साहन देणारे ठरते आणि पुढे त्याचे पर्यवसान गंभीर गुन्ह्यात होऊ शकते. रोड रोमिओंचा बंदोबस्त करण्याबाबत काही करणे पालकांच्या फारसे हाती नसते, त्यामुळे ते मुलींचे शिक्षण थांबवतात. यामुळे शाळेच्या पटावरून केवळ एक नाव कमी होते असे नव्हे, तर बालविवाहाच्या संभाव्य यादीतले ते एक नाव असते.

ग्रामीण भागातील बहुतांश मुली नोकरी किंवा शाळा-कॉलेजांत पोहोचण्यासाठी एसटी किंवा सहाचाकीने प्रवास करतात. तालुक्याच्या ठिकाणी शाळा, कॉलेजे सुटण्याच्या वेळी टवाळांची टोळकी बाइकवर गिरक्या मारत स्थानकांवर दिसतात. चौक, कट्टेही या बाजारू रोमिओंनी भरलेले असतात. मुली एकमेकींच्या सोबतीने जीव मुठीत घेऊन दररोज प्रवास करतात. हे चित्र भर दिवसा; दिवेलागणीनंतर एकटीने बाहेर पडण्याचे स्वप्न बघण्याचीही हिंमत मुली करू शकणार नाहीत, अशी स्थिती ग्रामीण भागांत अनेक ठिकाणी आहे.

रक्षा खडसे यांच्या मुलीची छेड काढणारे गुंड राजकीय पक्षाशी संबंधित असल्याचे छायाचित्रांसह प्रसिद्ध झाले आहे. याआधीही स्वारगेट बलात्कार प्रकरणातील आरोपी राजकीय पक्षाचा कार्यकर्ता असल्याचे समोर आले. अलीकडे राजकीय पक्षांचे कार्यकर्ते गुन्हेगारी पार्श्वभूमीचे असणे, हे नवल राहिलेले नाही. गुन्हे नावावर असलेले गुंड कार्यकर्ते म्हणून पोसणे ही सर्वपक्षीय रीत आहे. ‘आका’सोबतचे फोटो समाजमाध्यमांवर टाकले की काहीही राडेबाजी केली तरी आपल्याला कोणी हात लावू शकणार नाही, हा फाजील आत्मविश्वास त्यांच्यात आपोआप येतो. काही वर्षांपूर्वी एका हंडीबाज नेत्याने ‘कार्यकर्त्यांनी आवडत्या मुलीचे नाव सांगावे, मी तिला उचलून आणून लग्न लावून देईन,’ अशा गमजा जाहीरपणे मारल्या होत्या!

मुक्ताईनगरच्या प्रकरणातील मुलगी राजकीय कुटुंबातील आहे; ती एकनाथ खडसे यांची नात, रक्षा खडसे यांची मुलगी आणि रोहिणी खडसे यांची भाची आहे. मनात आणले असते तर खडसे कुटुंबीय या प्रकाराचे ‘उत्तर’ पोलिसांकडे न जाताही देऊ शकले असते; पण त्यांनी कायदेशीर वाटेवरून जाण्याचा निर्णय घेतला, हे कौतुकाचे. सातपैकी तीन आरोपींना अटकही झाली आहे. अशा घटना घडू शकतात आणि पोलिसांकडे जाऊन तक्रार करणे हा त्यावरील सर्वांत योग्य मार्ग आहे, हा संदेश राज्यातील लाखो मुली आणि त्यांच्या पालकांपर्यंत जाणे महत्त्वाचे होते. ते यामुळे घडले. काही वर्षांपूर्वी शाळा कॉलेजांचे परिसर आणि चौक, कट्टे अशा ठिकाणी पोलिसांची ‘दामिनी’ पथके तैनात करण्यात आली होती. त्यांनी रोडरोमिओंवर जोरदार कारवाई केल्यामुळे राज्यभर या गुंडांना चांगला वचक बसला होता. मधल्या काळात कदाचित राजकीय पक्षांनी गुडांना छत्रछायेखाली घेतल्याने पोलिसांचे हातही बांधले गेले असावेत. खडसे यांच्या मुलीच्या छेडछाडीसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राजकीय लागेबांधे बाजूला ठेवून कारवाईचे आदेश दिले आहेत. अशी कठोर कारवाई महिलांसंदर्भातील सर्व गुन्ह्यांबाबत व्हावी. ज्योती म्हापसेकर यांचे एक गीत आहे. ‘डोळं, तुमचं डोळं, तुमच्या डोळ्यांची मला भीती. खाली बघून चालू किती...’ राज्यभरातल्या मुली भयमुक्त होऊन मान उंचावून चालू शकतील, असे वातावरण तयार व्हावे, ही अपेक्षा अवाजवी ठरू नये.



# ‘तुम्हाला झुकावेच लागेल’

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि युक्रेनचे अध्यक्ष व्लजिमिर झिल्येन्स्की यांच्यात चर्चा सुरू आहे. झिल्येन्स्की यांना युक्रेनच्या सुरक्षिततेची हमी हवी आहे. झिल्येन्स्की यांच्या कणखर आवाजाने अमेरिकेचा अवमान झाल्याचा ग्रह ट्रम्प यांनी करून घेतला. झिल्येन्स्की यांना अमेरिकेच्या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त करायची असतानाही ती भावना ट्रम्प यांच्यापर्यंत पोहोचती करण्यात ते अपयशी ठरले.

नेत्यांचा एकमेकांवर विश्वास नसेल, एकमेकांशी किमान संवाद साधण्याची तयारी नसेल तर आंतरराष्ट्रीय चर्चा शक्य नसते. त्याचे अगदीच ठळक उदाहरण जगाला नुकतेच बघायला मिळाले. ठिणगी पडल्यानंतर तीस दिवसांत संपेल, असा अंदाज असताना रशिया आणि युक्रेन यांच्यात सुरू झालेले युद्ध तीन वर्षांनंतरही संपलेले नाही. या काळात रशियाचा वेळोवेळी झालेला मानभंग आणि युक्रेन करीत असलेला चिवट प्रतिकार यांची चर्चा चांगलीच रंगली आणि आजही रंगत आहे. या पार्श्वभूमीवर, अमेरिकचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि युक्रेनचे अध्यक्ष व्लजिमिर झिल्येन्स्की यांच्यात वाटाघाटींच्या टेबलावर रंगलेल्या युद्धाने या धुमश्चक्रीत तेल ओतले गेले आहे.

व्हाइट हाउसमध्ये दोन्ही नेत्यांमध्ये शुक्रवारी रात्री चर्चा झाली. 'तुम्ही सुट का परिधान केला नाही?' या प्रश्नावर, 'मी आता युद्धसमाप्तीनंतरच सूट घालेन,' असे आत्मविश्वासपूर्ण उत्तर झिल्येन्स्की यांनी दिले. उभय नेत्यांमधील चर्चेतील संवादाचा स्तर काय होता, हे कळण्यासाठी ही झलक पुरेसी ठरावी! 'पुतिन यांच्या सर्व अटी मानणार नाही,' असे निःसंदिग्ध प्रतिपादन झिल्येन्स्की यांनी



केले. त्यावर, 'तुम्हाला झुकावेच लागेल,' असा पवित्रा ट्रम्प यांनी घेतला. दोन्ही देशांचे प्रमुख टेचांत होते. अखेर त्यांची संयुक्त पत्रकार परिषद रद्द करावी लागली. 'मिनरल डील'ची घोषणाही अधांतरीच राहिली. सत्तासूत्रे आल्यापासून ट्रम्प यांचा अट्टहासी आविर्भाव सतत जाणवतो आहे. झिल्येन्स्की यांच्या बोलण्यातून गृहीत धरण्याच्या एकांगी धारणेला छेद दिल्याचे झळकले. त्यांना युक्रेनच्या सुरक्षिततेची हमी हवी आहे. झिल्येन्स्की यांच्या कणखर आवाजाने अमेरिकेचा अवमान झाल्याचा ग्रह ट्रम्प यांनी करून घेतला.

झिल्येन्स्की यांना अमेरिकेच्या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त करायची असतानाही ती भावना ट्रम्प यांच्यापर्यंत पोहोचती करण्यात ते अपयशी ठरले. युद्धविरामाऐवजी झिल्येन्स्की हे स्थितीला तिस[illegible]्या विश्वयुद्धाकडे ढकलण्याच्या प्रयत्नात असल्याचा आरोप ट्रम्प यांनी केला. दोन्ही नेत्यांचा आवेग परस्परपूरक नव्हता. युक्रेन तसाही जिंकणार नाही, ही झाली ट्रम्प यांची भावना. तर, राष्ट्रसन्मानाशी तडजोड नाहीच, यावर झिल्येन्स्की ठाम. व्लादिमिर पुतिन यांच्याशी फोनवर झालेल्या चचेर्नंतर युक्रेनला 'नाटो'मध्ये सामील करून घेण्यास रशिया तयार असल्याचा निरोप ट्रम्प यांनी दिल्याने ही चर्चा यशस्वी होईल, असे वाटत होते. अहंता आणि आदर या संकल्पना परस्परपूरक नसल्याचे तथ्य या वाटाघाटींनी स्पष्ट केले. थोडक्यात, शांततावार्तेच्या वाटा तूर्त ठप्प झाल्या आहेत.

# गपगुमान राहा आई...

**कशी आहेस गं आई, कशी आहेस गं बाई?**
**कशी आहेस गं माई, कशी आहेस गं ताई?**
**कुठं काही दुखतंय का, कुठं काही खुपतंय का?**
**काही बोलायचंय का, काही सांगायचंय का?**
**का उगा कुरकुरतेयस ? कशासाठी?**

आणखी काय काय मारू हाका तुला? आणखी काय काय म्हणू तुला? आणखी काय काय विचारू तुला? आमच्या घरांतील भिंतींवर फडफडणाऱ्या कॅलेंडरांमध्ये, आमच्या खिशांमधील मोबाइलांमध्ये तुज्या नावे काही दिवस अगदी ठळकपणे नोंदवून ठेवलेले आहेत. त्यातला एक दिवस त्तर अगदी आत्ताच झाला ना आई. २७ फेब्रुवारी. ते कुसुमाग्रज एकदा तुझ्याबाबत बोलून गेले ते कित्ती कित्ती लागलं माहित्ये आमच्या मनाला, आमच्या म्हणजे उभ्या-आडव्या पसरलेल्या महाराष्ट्राच्या मनाला. आमच्या मनाला लागावं असं काय बरं म्हणाले होते ते कुसुमाग्रज? त्यांनी वर्णन केलं होतं तुझं. 'मंत्रालयाच्या दारात तू लक्तरं नेसून उभी आहेस,' असं म्हणाले होते ते. खरं तर काय गरज होती त्यांना असलं काही बोलायची?

प्रेम कर भिल्लासारखं, बाणावरती खोचलेलं
मातीमध्ये उगवून सुद्धा,
मेघापर्यंत पोहोचलेलं....

अशी छानशी कविता लिहावी. प्रेमवीरांच्या हृदयात, मनात प्रेमाची बीजं सेवावीत, कशाला हे असलं काही, कुणाला टोचेल, कुणाला लागेल, असे बोलावं? माणजे, ते प्रेमाचे बाण कवितेत वगैरे ठीक आहेत हो. हे असे सत्याचे बाण कशाला सोडावेत कवीने?असो. पण त्या कुसुमाग्रजांचं बोलणं फारच मनावर घेतलं आम्ही हे खरं. तुझ्यासाठी काहीतरी करायलाच हवं... करायलाच हवं. खूप खूप विचार केला. गंमत म्हणजे, मायबाप सरकारनंही विचार केला. विचार करून करून जाहीरच करून टाकलं की बुवा, दर वर्षी कुसुमाग्रजांच्या वाढदिवशी तुझा गौरव केला जाईल. मग आम्ही दर वर्षी सुरूच केला तुझा गौरवदिन.

आणि यंदा तर तुझ्या गौरवाचा झेंडा जरा अधिकच उंचावला होता. कारणही तसंच होतं. थेट दिल्ली दरबारातून तुज्या महत्तेवर 'अभिजात' शिक्कामोर्तब झालं होतं. आणि त्यावर कड़ी म्हणजे यंदा 'सरहद्द' ओलांडून तु राजधानी पोहोचलीस, त्याच दिल्ली दरबारातील मनसबदारांनी, त्याच दिल्लीत तुझं कोडकौतुक केलं. आम्ही धन्य झालो. आई, माई, चाई... आता



हे इतके सगळं छान छान चालू असताना कशाला उगाच किरकिर करतेयस आमच्या कानाशी? बरं, ते कुसुमाग्रज म्हणाले होते तसली लक्तरं नाहीत हो आता तुझ्या अंगावर, पैठणी आहे की झक्कशी. अंगावर दागिनेही आहेत. इतकं सगळं आहे तरी समाधान म्हणून नाही बघ तुला कशात, ती घरातली एखादी आज्जीबाई असते ना... कितीही करा, काहीही करा तिच्यासाठी... कुरकुर काही सुटत नाही तिची. अगदी तश्शी अवस्था झालीये बघ तुझी.

सांग तरी, का अशी करतेयस? काय म्हणतेस? तुला तुझ्याच गावातले काही लोक किंमत देत नाहीत? तुझा अपमान करतात? कोण लोक ? हा... हा... हा... ते ना? आता कसंय ना आई, की ते नाही तुला ओळखत. आता ओळखत नाहीत तर काय कळणार त्यांना तुझं महत्त्वं. काय म्हणतेस? तुज्याविना चाललंय त्यांचं सगळे व्यवस्थित ? हो ना. अगं ताकदच आहे त्यांची तेवढी. चालून जातं सगळं त्यांचं. काय म्हणतेस ? तुला फक्त सणावारीच विचारतात. आता असतात काही लोक तसे... पण आम्ही काय म्हणतो, की तू मुळात लक्षच का देतेस त्यांच्याकडे? खायची-प्यायची तर ददात नाही ना तुला? छान खावं-प्यावं नि आराम बसावं. अधेमधे छानशी पैठणी नेसावी. मुलाबाळांत मिरवावी, या असल्या अपमानांकडे लक्षच नको देऊस तू. आम्ही देतो का लक्ष असल्या अपमानांकडे? त्याकडे लक्ष देणं आम्ही कधीच सोडलंय. तसल्या अपमानांचं आम्हाला आता काहीही वाटत नाही बघ. तूही तसाच विचार कर, गपगुमान राहा आई. गप्प राहा नाई. सुखी होशील बाई...

# तवा राईस

**सामग्री :** २ वाटी शिजवलेला भात, २ अख्ख्या लाल मिरच्या, १ चमचा आले-लसूण पेस्ट, फोडणीसाठी तेल, बारीक चिरलेला एक कांदा, गाजर, टोमॅटो (इच्छेप्रमाणे), अर्धा वाटी मटार, १/२ चमचा पाव भाजी मसाला, १/४ चमचा हळद पावडर, १/२ चमचा तिखट, मीठ स्वादानुसार.

**कृती :** सर्वात आधी गाजर आणि मटार उकळून घ्यावे जेणेकरून नरम होतील. एक मोठ्या पॅनमध्ये तेल गरम करून त्यात जिरं, अख्ख्या लाल मिरच्या आणि पाव भाजी मसाला टाका. नंतर कांदा, आले-लसूण पेस्ट टाकून मिक्स करा. नंतर टोमॅटो टाकून हलवून घ्या. शिजल्यासारखं वाटल्यावर त्यात मटार आणि गाजर टाका. नंतर हळद, तिखट, गरम मसाला, मीठ टाका. आता भात टाकून हलक्या हाताने हलवून घ्या. वरून कोथिंबीर, लिंबाने सजवून घ्या. दह्यासोबत सर्व्ह करा.



# केमिकल पिलिंग केल्यानंतर कशी घ्याल चेहऱ्याची काळजी ?



**चेहऱ्यावरील काळे डाग कमी करण्यासाठी, चेहरा उजळावा याकरिता केमिकल पिल्स फायदेशीर ठरतात. केमिकल पिल्समुळे त्वचेवरील निस्तेज आणि मृत स्तर काढायला मदत होते. त्यामुळे त्वचा अधिक तजेलदार होते. चेहऱ्यावर लावले जाणारे केमिकल त्वचेतील टिश्यूंचे नुकसान टाळण्यास मदत करतात. केमिकल पिलमध्ये ॲसिड, फळांचा, बोटॅनिकल एक्सट्रॅक्ट किंवा दुधाचा समावेश असतो. त्वचेच्या पोतनुसार आणि समस्येनुसार कोणते पिल वापरावे याचा निर्णय डॉक्टर घेतात. केवळ केमिकल पिल लावून तुम्हाला अपेक्षित निकाल मिळत नाहीत, तर त्यानंतरही त्वचेची काळजी घेणं आवश्यक आहे. यासाठी प्रसिद्ध सेलिब्रिटी डरमॅटोलॉजिस्ट डॉ. जयश्री शरद यांनी दिलेला हा खास सल्ला नक्की जाणून घ्या.**



▮ पिल लावल्यानंतर लगेचच आईस कॉम्प्रेसेस चेहऱ्यावर फिरवावे. किमान १०-१५ मिनिटे आईस कॉम्प्रेस चेहऱ्यावर ठेवा.

▮ केमिकल पिलनंतर किमान १० दिवस चेहऱ्याला स्क्रब किंवा गरम पाणी लागणार नाही याची काळजी घ्या. या दिवसांत चेहऱ्याला स्क्रब आणि गरम पाणी वापरू नका.

▮ सौम्य, न्यूट्रल pH फेशिअल क्लिंजरचा वापर करा. चेहरा स्वच्छ करण्यासाठी sebamed olive wash dla वा Cetaphil cleansing lotion चा वापर करावा.

▮ केमिकल पिल ट्रीटमेंट केल्यानंतर लगेचच तसेच सनस्क्रीन न लावता बाहेर पडू नका. उन्हात फिरत असल्यास किमान दोन-दोन तासांनी सतत सनस्क्रीन लावा.

▮ केमिकल पिल ट्रीटमेंटनंतर दोन दिवसांनी चेहऱ्यावर मॉईश्चरायझर लावायला सुरुवात करा.

▮ केमिकल पिलनंतर काही तासांतच त्वचेवरून एक पातळ स्तर निघायला सुरुवात होते. तो स्तर काढण्यासाठी सतत चेहऱ्याला हात लावू नका किंवा त्वचा खेचू नका.

▮ स्कीन पिलिंग होताना ब्लिचिंग किंवा केस काढण्यासाठी थ्रेडिंग, वॅक्सिंग करणे टाळा.

▮ पिलिंग होताना ॲण्टी ॲक्ने क्रीमचा वापर करू नका. तसेच स्क्रीन लाईटिंग क्रीम वापरणे टाळा.

# वारंवार तोंड येत असल्यास आजमावा हे उपाय

**पचनक्रिया** व्यवस्थित नसेल, किंवा शरीरामध्ये काही कारणाने उष्णता वाढली असेल, तर वारंवार तोंड येऊ लागते. यालाच 'माऊथ अल्सर्स' असेही म्हटले जाते. अनेकदा काही कारणासाठी घेतलेली औषधे उष्ण पडल्यानेही तोंड येऊ शकते. तोंड आले असता काही खाणे-पिणे कठीण होऊन बसते. जिभेवर बारीक फोड येतात आणि क्वचित वेदनाही होतात. बहुतेक वेळी बी कॉम्प्लेक्स घेतल्याने माऊथ अल्सर्स थोड्याच अवधीत बरे होतात. त्याच्या जोडीने काही घरगुती उपायांचा अवलंब करूनही हे माऊथ अल्सर्स बरे करता येऊ शकतात.

तुळस स्वास्थ्यवर्धक असून, यामध्ये वेदनाशमक गुण आहेत. तसेच शरीरातील उष्णता कमी करण्यासही तुळस सहाय्यक आहे. तोंड आले असता दिवसातून तीन ते चार वेळा तुळशीची पाने चावून खाल्ल्याने आराम मिळतो. जर पचनक्रिया सुरळीत नसल्याने शरीरातील उष्णता वाढून तोंड आले असले, तर ते बरे करण्यासाठी खसखस उपयुक्त ठरते. थोडी खसखस चावून खाल्ल्याने शरीरातील उष्णता कमी होऊन तोंडातील अल्सर्स लवकर निवळतात.

नारळाचे तेल आणि नारळाचे पाणी हे दोन्ही तोंडातील अल्सर ठीक करण्यासाठी अतिशय गुणकारी आहेत. नारळाच्या पाण्याने शरीरातील उष्णता दूर होत असून, नारळाचे तेल तोंडात धरून चूळ भरल्याप्रमाणे खुळखुळविल्यानेही तोंडातील अल्सर ठीक होण्यास मदत होते. याला 'ऑईल पुलिंग' म्हटले जाते. जिथे अल्सर आहेत त्यावरून नारळाचा चव लावल्यानेही तोंडातील अल्सर बरे होतात. त्याचप्रमाणे ज्येष्ठ मधाच्या पुडीमध्ये थोडासा मध घालून तोंडामध्ये आणि जिभेवर लावल्यास अल्सर ठीक होतात.



# फुफ्फुसाचा कर्करोग टाळण्यासाठी योग उपयुक्त



**फुफ्फुसाचा** कर्करोग हा जगामध्ये सर्वात जास्त आढळणाऱ्या कर्करोगांपैकी एक आहे. केवळ २०१८ या एकाच वर्षामध्ये जगभरामध्ये २,०९३,००० रुग्णांना फुफ्फुसाचा कर्करोग असल्याचे निश्चित निदान केले गेले. वास्तविक हा रोग महिलांच्या मानाने पुरुषांमध्ये अधिक आढळून येत असे. पण सध्याच्या काळामध्ये वाढते प्रदूषण, बदललेल्या जीवनशैली यामुळे हा रोग आता महिलांमध्येही आढळून येऊ लागला आहे. फुफ्फुसाच्या कर्करोगाचे चार प्रकार असून, यामध्ये 'अडेनोकार्सीनोमा' आणि 'स्क्वामस सेल कार्सीनोमा' हे दोन प्रकार जास्त आढळून येणारे आहेत. सध्याच्या प्रगत काळामध्ये फुफ्फुसाचा कर्करोग योग्य उपचार करून बरा होण्यातला असला, तरी मुळात या कर्करोगाचे निदान वेळेवर होणे अत्यावश्यक असते. या रोगाची अनेक लक्षणे असून, दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ सतत खोकला येणे, हात आणि बगलांमध्ये वेदना, मान आणि पाठदुखी, दम लागणे, अचानक वजन जलद घटू लागणे, थुंकीतून रक्त पडणे आणि सतत सुस्ती जाणवणे ही या रोगाची काही प्रमुख लक्षणे आहेत. या रोगावर निश्चित उपचार शोधीत असतानाच, सामन्य 'ॲलोपथीक' उपचार पद्धतीच्या जोडीनेच वैद्यकीय तज्ज्ञ इतर उपचार पद्धतींकडेही पाहत आहेत. या पद्धतींमध्येच योगसाधना फुफ्फुसाच्या कर्करोगावर अतिशय प्रभावी उपाय असल्याचे दिसून आले आहे. या संबंधी रिसर्च अमेरिकेमध्ये सुरू असून, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ येथील २६ रुग्णांवर केमोथेरपी आणि इतर उपचारांच्या सोबतच योगसाधनेद्वारेही यशस्वी उपचार करण्यात येत आहेत. या सर्व रुग्णांवर योगसाधनेचा प्रभाव इतका चांगला झाला, की कर्करोगातून पूर्ण बरे झाल्यानंतरही आता यातील अनेक रुग्णांनी योगसाधनेचा अवलंब त्यांच्या जीवनशैलीमध्ये कायमस्वरूपी केला असल्याचे समजते. योगसाधनेमुळे शरीर तणावरहित होत असून, जे रुग्ण केमोथेरपी किंवा रेडिएशन थेरपीसारखे उपचार घेत होते, त्यांच्यासाठी योगसाधना विशेष फायद्याची ठरली आहे. तसेच या रुग्णांच्या वैयक्तिक शारीरिक क्षमता आणि आवश्यकता लक्षात घेऊन त्यानुसार योगासने त्यांना शिकविली गेल्याने त्याचा या रुग्णांना विशेष लाभ झाल्याचे पहावयास मिळत आहे.

# व्यवस्थित काम करत असलेला स्मार्टफोन तुमच्या 'या' सवयींमुळे होतो खराब

**अनेक वेळा स्मार्टफोन योग्य काळजी न घेतल्यामुळे देखील अचानक खराब होतो आणि फोनवर केलेला खर्च व्यर्थ झाल्यासारखा वाटतो. पण, स्मार्टफोन नीट हाताळला आणि वापरताना काही गोष्टींची विशेष काळजी घेतली तर फोन खराब झाल्यामुळे होणारे नुकसान टाळता येऊ शकते. तुम्हीही या चुका करत असाल तर लगेच या सवयी बदला, अन्यथा तुमचा स्मार्टफोन कायमचा खराब होऊ शकतो. पाहा या काही सोप्या टिप्स.**



### चार्ज करताना लक्ष ठेवा

स्मार्टफोन चार्ज करताना खूप काळजी घ्यावी लागते. अनेकदा युजर्स फोन चार्जवर ठेवतात आणि त्याबद्दल विसरून जातात. यामुळे स्मार्टफोनचा मदरबोर्डही खराब होऊ शकतो. फोनचा मदरबोर्ड खराब झाल्यास तुम्हाला खूप त्रास सहन करावा लागेल. यामुळे फोन कायमचा डेड होऊ शकतो. फोन एकदा खराब झाल्यास, त्यानंतर तुम्हाला नवीनच फोन घ्यावा लागेल. कारण फोनच्या मदर बोर्डची किंमत खूप जास्त आहे.

### पाण्यापासून दूर ठेवा

पावसाळ्यात अनेकदा स्मार्टफोन खराब होतात. कारण, ते मदर बोर्डमध्ये हलका ओलावा आणतात. अशा परिस्थितीत फोनचा मदरबोर्ड कायमचा डेड होऊ शकतो. काही वेळा फोन पाण्याजवळ ठेवल्यास देखील मदर बोर्डमध्ये ओलावा येतो. मदर बोर्डमध्ये ओलावा असल्यास, फोन कायमचा डेड होऊ शकतो. फोनचा मदर बोर्ड खराब झाला असेल तर त्यानंतर फोनचा काहीही उपयोग होणार नाही.

### वारंवार चार्जिंग करणेसुद्धा नाही सुरक्षित

स्मार्टफोनचे वारंवार चार्जिंग करणे देखील टाळावे. जर तुम्ही स्मार्टफोनला वारंवार चार्ज करत असाल तर फोनच्या प्रोसेसरवर त्याचा मोठा परिणाम होऊ शकतो. काही प्रकरणांमध्ये यामुळे स्मार्टफोन कायमचा खराब होऊ शकतो. तसेच त्याचा सर्वात मोठा तोटा म्हणजे फोनची बॅटरी कायमची डेड होऊ शकते. अशा परिस्थितीत तुम्हाला फोनची बॅटरी आणि मदर बोर्ड दोन्ही बदलावे लागू शकतात. म्हणजेच चांगली मोठी रक्कम स्मार्टफोन रिपेयरसाठी खर्च करावी लागू शकते.

# चेहरा स्वच्छ ठेवण्यासाठी काही सोपे उपाय

**ताजेतवाने दिसण्यासाठी चेहरा स्वच्छ ठेवण्याची गरज असते. पण चेहरा स्वच्छ ठेवण्यासाठी काय, किती आणि कसं वापरायला पाहिजे हे माहिती असणंही गरजेचं आहे. पाहू चेहरा स्वच्छ ठेवण्यासाठी काही सोपे उपाय...**



**फेसवॉश :** चेहरा स्वच्छ आणि टवटवीत ठेवण्यासाठी फेसवॉश गरजेचं आहे, पण त्वचेच्या प्रकृतीनुरूप योग्य फेसवॉश वापरला पाहिजे. हर्बल फेसवॉश सर्वात उत्तम. तरीही दिवसातून फक्त दोन वेळा फेसवॉश वापरा. जर आपण मेकअप करत नसाल तर रात्री झोपण्यापूर्वी फक्त पाण्यानेही चेहरा धुवू शकता. ▮ ऑइली स्किनसाठी नीम, कोरफड, आणि मिंट फेसवाश योग्य विकल्प आहे. ▮ ड्राय स्किनसाठी केसर, मिल्क आणि हनी फेसवॉश वापरू शकता. ▮ डेड स्किनसाठी स्क्रब फेसवाश वापरणे योग्य ठरेल.

**कोमट पाणी :** फेसवॉशने चेहरा धुताना पाणी जास्त गरम नसलं पाहिजे याने स्किन खराब होते. त्वचेसाठी जास्त गार पाणीही योग्य नाही म्हणून ताज्या किंवा कोमट पाण्याने चेहरा धुवायला हवा.

**घासू नका :** चेहरा जास्त घासण्याने रंग गोरा दिसले हा विचार चुकीचा आहे. असे करणे हानीकारक ठरू शकतं. कारण अशाने त्वचेवरील नरम परत उतरते आणि स्किन कोरडी पडते. तसेच ज्यांना फेस वाइप्स वापरण्याची सवय असते त्यांनीही दिवसातून दोनपेक्षा जास्त वेळा याचा वापर करू नये.

**मेकअप काढा :** मेकअप काढणे अत्यंत आवश्यक आहे. मेकअप काढल्याने त्वचासुद्धा मोकळा श्वास घेऊ शकते.

# डोळ्यांच्याभोवती काळी वर्तुळे असण्यामागे असू शकतात ही कारणे



अनेकदा शारीरिक विश्रांती जर पुरेशी मिळत नसली, तर डोळ्यांभोवती काळी वर्तुळे दिसून येतात. मात्र केवळ शारीरिक थकवा आल्यानेच डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे येतात असे नाही, तर यासाठी इतरही अनेक कारणे असू शकतात. काहींच्या डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे 'पिग्मेंटेशन' मुळे असू शकतात. हे पिग्मेंटेशन काहींच्या बाबतीत अनुवांशिक असू शकते. दक्षिण आशियाई लोकांमध्ये अशा प्रकारचे पिग्मेंटेशन दिसून येते. पिग्मेंटेशनमुळे जर डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे असतील, तर कितीही उपाय-उपचार केले तरी ही वर्तुळे हलकी होतात, पण नाहीशी होत नाहीत.

ज्या व्यक्तींना चेहऱ्यावरील त्वचेवर सोरायसिस किंवा एक्झिमा सारखे त्वचा विकार असतील, त्यांच्याही डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे दिसून येऊ शकतात. या दोन्ही विकारांमध्ये त्वचा लालसर, किंवा गडद रंगाची दिसू लागते. तसेच सतत खाज सुटत असल्याने ही त्वचा आणखीनच काळसर दिसू लागते. त्यामुळे जर डोळ्यांच्या आसपासच्या त्वचेवर एक्झिमा किंवा सोरायसिस असले, तर त्यामुळे डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे असल्याप्रमाणे भासतात.

ज्या व्यक्तींना सतत डोळे चोळण्याची सवय असते, त्यांच्या डोळ्याच्या आसपासची त्वचा वारंवार चोळली गेल्यामुळे काळसर आणि काहीशी जाडसर दिसू लागते. वारंवार डोळे चोळल्याने डोळ्यांच्या आसपासची त्वचा रगडली जाते. त्यामुळे त्वचेच्या खाली असलेल्या रक्तपेशींना नुकसान पोहोचते आणि त्यामुळे त्वचा काळसर दिसू लागते.

अनेकदा डोळ्यांभोवती काळी वर्तुळे एखाद्या ॲलर्जीमुळेही असू शकतात. या वर्तुळांच्या जोडीनेच डोळ्यांच्या आसपास हलकी सूजही दिसून येते. त्यामुळे याचे निदान डॉक्टरांकडून करून घेऊन योग्य औषधोपचार आणि भरपूर विश्रांतीनंतर ही काळी वर्तुळे नाहीशी होतात.



शरीरामध्ये पाण्याची कमतरता झाल्यास, म्हणजेच डीहायड्रेशन झाल्यासही डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे दिसून येतात. एखाद्या आजारपणामुळे किंवा अतिरिक्त मद्यपानामुळे शरीरातील इलेक्ट्रोलाईट्स कमी होऊ लागतात, त्यामुळे डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे उद्भवतात. अशा वेळी पाण्याचे प्रमाण वाढवल्याने कालांतराने ही समस्या दूर होऊ शकते.

**पुदिन्याच्या पानांमुळे अनेक रोग दूर होतात. पुदिना चटणी जर समोशाबरोबर सेवन केली तर त्यामुळे चवच वाढते असे नव्हे तर पचनही चांगले होते. पुदिना वनस्पतीमुळे पोटात शांत वाटते व आग होत नाही.**

# पुदिना सर्दी, अन्नपचनावर उपयुक्त

**पुदिन्याची** पाने अन्नपचन, मुख आरोग्य, सर्दी यावर गुणकारी असल्याचा दावा तज्ज्ञांनी केला आहे. डाबर रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंटचे प्रमुख जेएलएन शास्त्री व सर गंगाराम रुग्णालयाचे वरिष्ठ आयुर्वेद सल्लागार परमेश्वर अरोरा यांनी संशोधनाअंती पुदिन्याचे अनेक उपयोग सांगितले आहेत. त्यानुसार पुदिन्यात अँटीऑक्सिडंट व फायटोन्यूट्रिअंट असतात त्यातून पोटातील स्नायूंना आराम मिळतो. पुदिन्याच्या पानांमुळे अनेक रोग दूर होतात. पुदिना चटणी जर समोशाबरोबर सेवन केली तर त्यामुळे चवच वाढते असे नव्हे तर पचनही चांगले होते. पुदिना वनस्पतीमुळे पोटात शांत वाटते व आग होत नाही. शरीराचे तापमान वाढत नाही. या सगळ्याचा संबंध डोकेदुखी व अर्धशिशी यांच्याशी असतो. मुख आरोग्यात पुदिना गुणकारी असून त्यात जंतुनाशक गुण असतात, परिणामी तोंडातील घातक जिवाणू मारले जातात व जीभ, दात स्वच्छ राहतात. पुदिना कफ व सर्दीवर उपयुक्त आहे. त्वचारोगांवरही पुदिना उपयोगी असून त्यामुळे त्वचेची आग कमी होते व कीटकदंश, इतर ॲलर्जीने होणारे दुष्परिणाम टळतात. पुदिना ही पचनासाठी उपयुक्त वनस्पती असून त्यामुळे गॅस होणे टळते, अपचन, उलट्या व अतिसारापासून संरक्षण मिळते. पुदिन्याची पाने पाण्यात काही तास भिजवून नंतर खावीत व त्याचा अर्क जास्त उपयुक्त असतो.



# सरबत बनवताना लक्ष देण्यासारख्या काही गोष्टी...

- ज्याचे सरबत बनवायचे त्याचा रस किंवा काढा १ वाटी, पाणी १ वाटी, साखर २ वाटी घ्यावी.
- पाणी व साखर एकत्र करून उकळावं.
- उकळी येऊन फेस शांत झाला व मिश्रण स्वच्छ दिसू लागलं की गॅस बंद करावा.
- त्यात आधी तयार करून ठेवलेला रस / काढा मिसळावा आणि ढवळावा.
- नंतर हे मिश्रण गाळून स्वच्छ, कोरड्या बरणीत भरून ठेवावं. यालाच सरबताचं 'कॉन्सन्ट्रेट' म्हणतात.

### चंदन, वाळा सरबत

**घटक :** चंदन पूड १० ग्रॅम, वाळा पावडर १० ग्रॅम, पाणी १०० मिली. साखर २०० ग्रॅम.

**कृती :** पाणी उकळल्यावर गॅस बंद करावा. उकळलेल्या पाण्यात चंदन व वाळा पावडर टाकून ते झाकून ठेवावं. दोन तासानं मिश्रण चांगलं ढवळून घ्यावं. नंतर ते गाळून घेऊन मोजावं. १ वाटीच्या मिश्रणास दोन वाटी साखर आणि एक वाटी पाणी घ्यावं. पाणी व साखर एकत्र उकळून घ्यावं. उकळी येऊन फेस शांत झाला आणि मिश्रण स्वच्छ दिसू लागलं की गॅस बंद करावा. त्यात चंदन वाळ्याचं तयार केलेलं मिश्रण टाकून ते चांगलं ढवळावं. सरबताचं हे सिरप गाळून कोरड्या बरणीत भरून ठेवावं.



### उपयोग

दाहशामक, डोळ्यांची आग, लघवीची आग कमी करतं. सतत तहान लागणं, ज्वर यासारख्या उन्हाळ्यातील तक्रारीत उपयुक्त.

# आईला गर्भाशयाचा कर्करोग असल्यास जन्माला येणाऱ्या मुलाला डोळ्याचा कर्करोग होण्याची शक्यता

**कुटुंबातील** एखाद्या सदस्याला डोळ्याचा कर्करोग असल्यास पुढील पिढीतील लहान मुलालादेखील हा आजार होण्याची दाट शक्यता असते. अनुवंशिक आजार होण्याचे प्रमाण ३० टक्के आहे. मात्र, ७० टक्के मुलांना कोणतीही कौटुंबिक पार्श्वभूमी नसताना हा आजार झाल्याचे निदर्शनास आले आहे. आईला गर्भाशयाचा कर्करोग असल्यास जन्माला येणाऱ्या मुलाला डोळ्याचा कर्करोग होण्याची दाट शक्यता असते. आईच्या गर्भाशयाच्या कर्करोगाला कारणीभूत 'ह्युमन पॅपिलोमा' हा व्हायरस या मुलाच्या जन्माच्या वेळी त्यांच्या डोळ्यांना बाधा निर्माण करतो. त्यामुळे मुलांना डोळ्याचा कर्करोग होतो. डोळ्यांच्या कर्करोगाचे (रेटिनोब्लास्टोमा) प्रमाण लहान मुलांत सर्वाधिक असून भारतात दरवर्षी या आजाराचे दोन ते अडीच हजार रुग्ण आढळतात. साधारणतः सहा वर्षांच्या आतील मुलांना हा आजार होत असला तरी या आजाराची लागण झालेल्या मुलांवर तत्काळ उपचार केल्यास त्यातून त्यांची मुक्तता करता येते. मात्र ६० टक्के मुलांच्या आजाराचे निदान वेळेत होत नसल्याने त्यांच्यावर उपचार करणे कठीण होते. डोळ्यांच्या ट्यूमरने ग्रस्त रुग्णांच्या संख्येत दोन ते तीन पटीने वाढ झाली आहे. विकसित देशांत रेटिनोब्लास्टोमा होऊनही त्यातून बचावणाऱ्या मुलांचे प्रमाण ९५ टक्के आहे.



### आजाराचा धोका

डोळ्यांचा कर्करोग लहान मुलांत आढळतो. या आजाराच्या एकूण प्रकरणांपैकी दोनतृतीयांश प्रकरणे वय वर्षे दोनहून कमी वय असलेल्या मुलांत दिसून आली आहेत. तर ९५ टक्के प्रकरणे वय वर्ष पाचहून कमी वय असलेल्या मुलांबाबत आहेत.

### लक्षणे

- ▮ डोळे तिरळे होणे किंवा डोळे सारखे हलणे
- ▮ एकाच किंवा दोन्ही डोळ्यांतील दृष्टी मंदावणे
- ▮ दोन्ही डोळ्यांत वेगवेगळ्या रंगांची बुब्बुळ असणे
- ▮ डोळ्यातल्या बाहुल्या आकाराने मोठ्या भासणे किंवा लाल होणे आणि त्यासह डोळ्यांत तीव्र वेदना होणे

### निदान कसे करावे

डोळ्यांचा कर्करोग झाल्यास नेत्रचिकित्साकडून डोळ्यांची तपासणी आणि इमेजिंग टेस्ट करून घ्याव्यात. त्यातून रेटिनोब्लास्टोमा आहे किंवा नाही, याचे निदान होऊ शकते. याशिवाय बायोमायक्रोस्कोपी, डोळ्यांची अँजिओग्राफी, सी.टी. स्कॅन, एमआरआय, पेटस्कॅन, बायॉप्सी या तपासण्यांच्या सहाय्याने डोळ्याच्या कर्करोगाचे निदान निश्चित होते. डोळ्यांच्या कर्करोगावर रेडिएशन, केमोथेरपी आणि लेझरथेरपी यांच्या सहाय्याने उपचार केले जातात. या उपचारपद्धती आवश्यक असल्या तरी डोळा शस्त्रक्रिया करून काढून टाकावा लागतो. तसेच रेडिएशनमुळे मोतिबिंदू किंवा डोळा पूर्णतः कोरडा होणे, हे दुष्परिणाम दिसून येतात. डोळ्यांचा कर्करोग झालेल्या १० मुलांपैकी ९ मुलांचा रेटिनोब्लास्टोमा पूर्णपणे बरा करता येतो. ट्यूमर डोळ्यांच्या बाहेर पसरला नसेल तर रेटिनोब्लास्टोमा झालेले रुग्ण बरे होऊन भविष्यात निरोगी आयुष्य जगू शकतात.

## आम्हाला पंधराशे रुपये नको, रोजगारासह सुरक्षेची हमी द्या...
# मनसेच्या महिला सेनेची मागणी



**■ठाणे :** एकीकडे जागतिक महिला दिनानिमित्त वेगवेगळ्या कार्यक्रम राबविले जात असतानाच, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या महिला विभागाने ठाण्यात अनोखे आंदोलन करत महिलांच्या सुरक्षेच्या मुद्द्याकडे सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. मनसेच्या महिला पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी शनिवारी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत आंदोलन करत आम्हाला पंधराशे रुपये नको, रोजगारासह सुरक्षेची हमी द्या, अशी मागणी केली.

८ मार्च रोजी सर्वत्र मोठ्या उत्साहात जागतिक महिला दिन साजरा केला जातो. यानिमित्ताने वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. परंतु गेल्या काही महिन्यांपासून महिलांच्या सुरक्षेचा मुद्दाही पुढे येत असून जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत मनसेने आंदोलन करत हाच मुद्दा उपस्थित करून सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. मनसेच्या महिला विभागाच्या ठाणे शहराध्यक्ष समीक्षा मार्कंडे यांच्या नेतृत्वाखाली ठाणे स्थानक परिसरात आंदोलन करण्यात आले. ह्य३६५ दिवस महिला दिन साजरा हवाह्न, ह्यतिला बंधन नको, तिला स्वातंत्र्य हवेह्न, ह्यअशा नराधमांसाठी कायदा आमच्या हातात द्याह्न अशा विविध आशयांचे फलक घेऊन मनसेच्या महिला कार्यकर्त्या आंदोलनात सहभागी झाल्या होत्या. सरकारने महिलांच्या खात्यात पंधराशे रुपए जमा करून महिलांना खुश करण्याचा प्रयत्न केला. पण त्या बदल्यात महागाई वाढवली आहे. सामान्य महिलांचे जगणे कठीण झाले आहे. घरातील खर्च किती असावा, हे ठरवण्याची ताकद महिलांमध्ये आहे. पंधराशे रुपये आम्हाला नकोत, महिलांना रोजगार आणि सुरक्षिततेची हमी द्या, अशी मागणी समीक्षा मार्कंडे यांनी केली. महिलांनी सक्षम होण्यासाठी आणि सुरक्षित राहण्यासाठी सरकारने ठोस उपाययोजना करायला हव्यात. रोजचा दिवस हा महिलांचा आहे. जर महिला घर सांभाळू शकते तर, हा देश पण सांभाळू शकते आणि महिला आहेत म्हणून सगळे आहेत. प्रत्येक महिलेला स्वाभिमान आहे, तोच हक्क आहे, तुम्ही तुमच्यासाठी लढा, तुमचा हक्क तुम्ही मागा असेही त्या म्हणाल्या.

## भिवंडीच्या कोंडी संदर्भात महापालिका आयुक्त ॲक्शन मोडवर
# कोंडीवरील उपाय योजनेसाठी होणार कृती समिती गठीत



**■ठाणे :** भिवंडी शहरातील वाहतुक कोंडीच्या विळख्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहे. नव नियुक्त महापालिका आयुक्त अनमोल सागर यांच्याकडेही नागरिकांच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या पार्श्वभूमीवर अनमोल सागर यांनी महापालिका अधिकारी आणि ठाणे पोलिसांसोबत बैठक आयोजित करुन वाहतुक कोंडी आणि इतर वाहतुक समस्येविषयी महत्त्वपूर्ण सूचना केल्या. शहरातील वाहतुक कोंडीवर उपाय योजना करण्यासाठी एक कृती समिती गठीत करण्यात येणार आहे. ही समिती येत्या दोन आठवड्यात भिवंडीच्या वाहतुक समस्या आणि उपाययजोना संदभार्चा अहवाल सादर करणार आहे.

भिवंडी शहरातून मोठ्याप्रमाणात हलक्या वाहनांची वाहतुक होते. तसेच भिवंडीत गोदामांची संख्या अधिक असल्याने गुजरात आणि उरण जेएनपीटीहून येणारी अवजड वाहने देखील शहरात वाहतुक करतात. मुंबई नाशिक महामार्ग, कशेळी- भिवंडी रोड हे महत्त्वाचे मार्ग देखील शहरातून जातात. असे असले तरी रस्त्यांची स्थिती चांगली नसल्याने अतिक्रमण, बेशिस्त वाहतुकीमुळे दररोज नागरिकांना कोंडीचा सामना सहन करावा लागत आहे. काही दिवसांपूर्वीच भिवंडी महापालिकेत अनमोल सागर यांची नियुक्ती झाली आहे. भिवंडीत वाहतुक समस्येविषयी नागरिकांच्या तक्रारी त्यांना प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे गुरुवारी ठाणे पोलीस विभाग आणि महापालिका अधिकाऱ्यांसोबत अनमोल सागर यांची महत्त्वपुर्ण बैठक पार पडली. आयुक्त सागर यांनी या बैठकीमध्ये शहरामध्ये वाहतुक कोंडीची ठिकाणे, रस्त्यावरील अतिक्रमण, वाहन तळासाठी जागा निश्चिती इत्यादी बाबींचा आढावा घेतला.

तसेच शहरातील वाहतुक कोंडीवर उपाय योजना करण्यासाठी एक कृती समिती गठीत करण्यात येणार आहे. यामध्ये महापालिकेचे अधिकारी आणि पोलीस विभागाचे अधिकाऱ्यांचा समावेश असेल. ही समिती शहरातील वाहतुक कोंडीच्या ठिकाणांवर करण्यात येणाऱ्या उपाय योजना, सिग्नल यंत्रणांचा वापर, रिक्षा चालकांसाठी वाहनतळ, वाहन शुल्क भरून वाहन तळ, अनधिकृत रिक्षांना बंदी, महत्त्वाच्या रस्त्यांवर सम-विषम तारखांना पार्किंग सुविधा करता येईल का याबाबत अभ्यास करणे, वाहतुक साहाय्यकांची नेमणुक करणे, सकाळी आणि सायंकाळच्या वेळेत वाहतुक कोंडीची ठिकाणे मोकळी करणे बाबत दोन आठवड्यात अहवाल सादर करणार आहे. दोन्ही विभागाच्या संयुक्त विद्यमाने हा अहवाल सादर होणार आहे.

तसेच, यापुढे महापालिकेतर्फे कोणत्याही भागात रस्ते दुरूस्ती, पाणी पुरवठा वाहिनींची कामे करण्यापुर्वी पोलीस विभागाला कळवून त्या भागातील वाहतुकीचे नियमन केले जाणार असल्याचेही नमूद करण्यात आले. या बैठकीस भिवंडी महापालिकेचे अतिरीक्त आयुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त बाळकृष्ण क्षीरसागर, साहायक पोलीस आयुक्त दीपक देशमुख, साहायक पोलीस आयुक्त ओहोळ, शहर अभियंता जमील पटेल यांच्यासह पोलीस अधिकारी आणि महापालिका अधिकारी उपस्थित होते.

# महिला सक्षमीकरणावर भर... ठाणे जिल्हा परिषदेकडून वर्षभरात २०० हून अधिक महिलांना अर्थसाहाय्य




- या योजनेचा लाभ विधवा, परित्यक्ता आणि दारिद्र्यरेषेखाली म्हणजे ज्यांचे उत्पन्न १ लाखापेक्षा कमी आहे, अशा महिलांना प्राधान्याने दिला जातो.
- या योजनेसाठी चालू वर्षाकरिता ६०० हून अधिक अर्ज प्राप्त झाले आहेत. या महिलांच्या अर्जांची छानणी करून लवकरच लाभार्थी महिलांना योजनेचा लाभ देण्यात येणार आहे.

**■ठाणे :** ग्रामीण भागातील महिलांचे जीवनमान उंचवण्यासाठी आणि त्यांना कुटुंबाच्या उत्पन्नात हातभार लावता यावा, यासाठी शासनाच्या विविध योजनांतर्गत आर्थिक साहाय्य दिले जाते. विशेषतः घरघंटी व शिलाई यंत्रणा खरेदीसाठी दिल्या जाणाऱ्या अनुदानामुळे अनेक महिलांना स्वतःचा रोजगार सुरू करण्याची संधी मिळाली.


ठाणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात या योजनेच्या माध्यमातून गेल्या वर्षभरात २०० हून अधिक महिलांनी स्वतःचा व्यवसाय सुरू केला असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास विभागाने दिली.

महिलांनी रोजगारासाठी पुढे येणे, ही केवळ त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाची बाब नसून, संपूर्ण कुटुंबाच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे पाऊल आहे. शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन अधिकाधिक महिलांनी स्वावलंबनाच्या दिशेने वाटचाल करावी, असे आवाहन वेळोवेळी केले जाते. यासाठी शासनस्तरावर विविध योजना सुरू करण्यात आल्या आहेत. या योजनांची अंमलबजावणी जिल्हा स्तरावर केली जाते. त्यातील एक म्हणजे घरघंटी आणि शिलाई मशीन खरेदीसाठी शासनाकडून देण्यात येणारे अनुदान ही एक योजना आहे.

या योजनेची माहिती ग्रामीण भागातील महिलांपर्यंत पोहोचावी, त्यासाठी तालुकास्तरावर अंगणवाडी सेविकांच्या माध्यमातून जनजागृती केली जाते. त्यानंतर जी महिला या योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक असते अशा महिलांचा अंगणवाडीसेविका अर्ज भरून घेतात. त्यानंतर, तो अर्ज महिला व बालविकास विभागाकडे येतो. त्या अर्जांची छानणी होऊन लाभार्थी महिलेला घरघंटी किंवा शिलाई यंत्रणा घेण्यासाठी अनुदान दिले जाते. जिल्ह्यात गेल्या वर्षभरात २०० हून अधिक महिलांना अर्थसाहाय्य मिळाले. यामध्ये ११५ महिलांनी घरघंटी, तर ८६ महिलांनी शिलाई मशीन घेतली असल्याची माहिती महिला व बाल विकास विभागाने दिली.

> "महिलांच्या सक्षक्तीकरणासाठी विविध योजना राबविल्या जात आहे. त्यातील घरघंटी आणि शिलाई यंत्रणासाठी अर्थसाहाय्य ही एक योजना आहे. या योजनेविषयी ग्रामीण भागातील महिलांना माहिती मिळावी, यासाठी ग्रामपंचायत कार्यालयाबाहेर पत्रके लावली आहेत. तसेच अंगणवाडीसेविकांच्या मार्फत योजनेची जनजागृती केली जात आहे."
>
> **-संजय बागुल, विभागप्रमुख, महिला व बालविकास, ठाणे जिल्हा परिषद**

## आमदार किसन कथोरेंचा आरोप, चौकशीची मागणी
# प्रशासक काळात बदलापुरात मोठा भ्रष्टाचार




**■बदलापूर :** कुळगाव बदलापूर नगरपालिकेत गेल्या २०२० पासून प्रशासकीय राजवट आहे. या काळात मुख्याधिकारी आणि प्रशासक पद एकाच व्यक्तीकडे असून या कालावधीत निधीचे १० -१० लाखांचे तुकडे करून अनेक कामे केली गेली आहेत. यात कोणताही दर्जा तपासला गेला नाही. त्यामुळे अशा कामांची चौकशी करावी, अशी मागणी करत मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसन कथोरे यांनी एकच खळबळ उडवून दिली. विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात पुरवणी मागण्यावर बोलत असताना त्यांनी शिलाई मशिन आणि घरघंटी वाटपाच्या कार्यक्रमावरही आक्षेप घेत याचीही चौकशी करण्याची मागणी केली आहे. या आरोपामुळे बदलापुरातील राजकारण पुन्हा एकदा ढवळून निघण्याची शक्यता आहे.

कुळगाव बदलापूर नगरपालिकेच्या निवडणुका २०२० वर्षात होणे अपेक्षित होते. मात्र त्याचवेळी करोना काळात लागलेली टाळेबंदी आणि नंतर विविध कारणांमुळे रखडलेली टाळेबंदी यामुळे पाच वर्षे उलटूनही निवडणूक झालेली नाही. लोकप्रतिनिधी नसल्याने मुख्याधिकारी यांच्याकडेच प्रशासक पदाचा चालतो आहे. लोकप्रतिनिधी नसल्याने अनेक कामांची माहिती नसते. अनेकदा नागरिकांच्या समस्या ऐकण्यासाठी अधिकारी उपस्थित नसतात, अशी भूमिका कथोरे यांनी बोलताना मांडली. प्रशासकांकडून सुरू असलेल्या कारभार आहे. त्यामुळे लोकांचा आणि पालिकेचा थेट संबंध संपलेला आहे. पालिकेचे ठराव, त्यांची मंजुरी, त्याचे होणारे काम, त्याची लेखापरिक्षण अशा गोष्टींबाबत सर्वसामान्य आणि लोकप्रतिनिधींना माहिती मिळत नाही. याचा गैरफायदा घेतला जात असल्याचा आरोप अनेकदा दबक्या आवाजात होत होता. मात्र विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात पुरवणी मागण्यांवरील चर्चेत मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसन कथोरे यांनी याच प्रशासकीय राजवटीवर बोट ठेवत गंभीर आरोप केले आहेत. २०२० पासून प्रशासकपदाच्या काळात विविध कामात भ्रष्टाचार झाला आहे. कारभार मनमानी पद्धतीने कामांवर लक्ष ठेवण्यासाठी कुणी नाही, त्याच्या तपासणीसाठी चांगले अधिकारी नाही. त्यामुळे या कामांची चौकशी करावी अशी मागणी कथोरे यांनी यावेळी केली.

त्याचवेळी प्रशासकांच्या काळात निधीचे वाटप १०-१० लाखांचे तुकडे करून केले गेले आहे. त्यातून कामाचा दर्जा राहिलेला नाही असाही खळबळजनक आरोप किसन कथोरे यांनी केला. त्यामुळे या कामांची चौकशी करण्याची मागणी आमदार कथोरे यांनी केली आहे. यावेळी त्यांनी मुरबाडमधील दिवाणी न्यायालये, पोलीस ठाणे आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कार्यालयासाठी निधी देण्याची मागणी केली.

### घरघंटी, शिलाई मशिन वाटपाचीही चौकशी करा

कुळगाव बदलापूर नगरपालिका, महिला व बालकल्याण विभाग आणि प्रधानमंत्री खजीन क्षेत्र योजनेअंतर्गत अडीच कोटी खर्चातून शिलाई मशिन आणि घरघंटीचे वाटप महिलांना करण्यात आले होते. कोणत्याही निविदेशिवाय याचे वाटप कसे झाले, नियमभंग करून हे वाटप झाल्याने याची चौकशी करण्याची मागणी आमदार कथोरे यांनी केली. मनमानी पद्धतीने आर्थिक देवाणघेवाणीतून याचे वाटप करण्यात आल्याचाही गंभीर आरोप कथोरे यांनी केला. या उपक्रमात स्थानिक शिवसेना शहरप्रमुख वामन म्हात्रे यांचा पुढाकार होता. त्यामुळे कथोरे यांच्या आरोपानंतर आता बदलापुरातील राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे.

# पालिकेच्या डोंबिवली विभागीय कार्यालयाभोवती कचऱ्याचा वेढा, दुर्गंधीने नागरिक हैराण



या ढिगांवर दिवसा, रात्री उंदरांचा राबता असतो. रात्रीच्या वेळेत मद्यपी, गर्दुल्ले याठिकाणी येऊन बसतात. डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानक परिसरात हा भाग येतो. त्यामुळे टाकाऊ वस्तू याठिकाणी फेकून दिल्या जातात. धोकादायक म्हणून या इमारतीकडे पालिकेचे लक्ष नाही. यापूर्वी या इमारतीत पालिकेचे ग आणि फ प्रभाग कार्यालये असायची. सतत कर्मचाऱ्यांची वर्दळ असायची. त्यामुळे पालिकेच्या आतील, बाहेरील भागाची नियमित स्वच्छता केली जात होती.

**■डोंबिवली :** कल्याण डोंबिवली महापालिकेच्या डोंबिवली विभागीय कार्यालयाची इमारत पाच वषार्पूर्वी धोकादायक म्हणून जाहीर करण्यात आली आहे. या इमारतीमधील कार्यालये डोंबिवलीतील इतर भागात सुरू करण्यात आली आहेत. त्यामुळे कर्मचारीमुक्त असलेल्या या इमारतीची आता देखभाल होत नसल्याने या इमारतीच्या पाठीमागील अडगळींच्या जागेत कचऱ्याचे ढीग साचले आहेत.

आता या इमारतीत कर्मचारी नसल्याने या इमारतीचा कोंडवडा झाला आहे. इमारतीत धुळीचे थर साचले आहेत. दस्तऐवज अस्ताव्यस्त पडले आहेत. त्यावर धूळ साचली आहे. बाहेरील भागात कचऱ्यावर घुशी, उंदीर यांचा वावर आहे. याठिकाणी सतत असते. या इमारतीच्या इंदिरानगर चौक भागात स्वामी विवेकानंद, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळे आहेत. इंदिरा चौक दिशेकडून पालिका इमारतीचा भाग रस्त्यावर येतो. या इमारतीच्या बाजुला रिक्षा वाहनतळ आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळेत या भागातील पदपथ, मोकळ्या जागेत अनेक गैरप्रकार चालतात. मद्यपी, गर्दुल्ले याठिकाणी तळ ठोकून असतात. तंबाखू, पान खाऊन हा भाग लालभडक करण्यात आला आहे.

पालिकेत नियमित राष्ट्रपुरूषांचे स्मरण केले जाते. त्याच बरोबर पालिकेच्या डोंबिवली इमारतीशी संबंधित अधिकाऱ्यांनी ही इमारत धोकादायक स्थितीत उभी असली तरी त्याच्या आजुबाजुला स्वच्छता राहील याची काळजी घ्यावी. राष्ट्रपुरूषांचे पुतळे आणि त्याच्या बाजुला कचऱ्याची घाण, दुर्गंधी पाहून याविषयी अनेक जाणकार नागरिक याविषयी तीव्र नाराजी व्यक्त करत आहेत. स्वामी विवेकानंद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती असली की त्या दिवशी पालिकेच्या इमारती जवळचा परिसर पालिका सफाई कामगारांकडून स्वच्छ केला जातो. ही सफाई नियमित ठेवण्यात यावी, अशी नागरिकांची मागणी आहे.

# वागळे इस्टेटमधील कचराभूमीत आग, सुदैवाने कोणतीही जीवितहानी नाही



**■ठाणे :** वागळे इस्टेट भागातील सीपी तलाव परिसरात असलेल्या पालिकेच्या या कचरा हस्तांतरण केंद्रावरील कचऱ्याला मोठ्या प्रमाणात आग लागल्याची घटना शुक्रवारी उघडकीस आली आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. परंतू, या आगीच्या धुराचे लोट परिसरात पसरल्यामुळे आजूबाजूच्या परिसरात राहणाऱ्या नागरिकांना तसेच याभागात असलेल्या कंपनीमधील कर्मचाऱ्यांना याचा खूप त्रास झाल्याची माहिती समोर आली आहे.

वागळे इस्टेट भागातील सीपी तलाव परिसरात पालिकेच्या या कचरा हस्तांतरण केंद्रावर शहरातील विविध भागातील कचऱ्याचे संकलन करुन त्याचे वर्गीकरण केले जाते. त्यामुळे याठिकाणी दररोज कचऱ्याचे ढीग लावले जातात.

या कचरा हस्तांतरण केंद्राजवळ लोकवस्ती, मोठमोठे गृहसंकुले तसेच औद्योगिक कंपन्या आहेत. कचरा हस्तांतरण केंद्रामुळे परिसरात पसरलेल्या दुर्गंधी आणि घाणीच्या साम्राज्यामुळे स्थानिक नागरिकांकडून हे कचरा हस्तांतरण केंद्र याठिकाणाहून हटविण्यासाठी वारंवार मागणी केली जात आहे. या कचरा हस्तांतरण केंद्रावरील कचऱ्याला शुक्रवारी सायंकाळी ४ वाजताच्या सुमारास आग लागली.

याची माहिती स्थानिक रहिवाशांनी ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन विभागाला दिली. माहिती मिळताच, सहाय्यक आयुक्त सुनील मोरे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यासीन तडवी, अग्निशमन अधिकारी आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, ठाणे आपत्ती प्रतिसाद दलाचे जवान आणि अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. आग मोठ्या प्रमाणात पसरल्यामुळे ती विझविण्याचे शर्तीचे प्रयत्न सुरु होते.

परंतु, आगीच्या धुराचे लोट आजूबाजूच्या परिसरात पसरल्यामुळे भितीचे वातावरण निर्माण झाले होते. अखेर ही आग अग्निशमन दलाचे जवान, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी आणि ठाणे आपत्ती प्रतिसाद दलाचे जवान यांच्या मदतीने ७ वाजताच्या सुमारास पूर्णपणे विझविण्यात आली.

# अल्पवयीन भाचीसह महिलेला वेश्या व्यवसायात ढकलणाऱ्या दलाला ठाणे पोलिसांकडून अटक



**■ठाणे :** उत्तरप्रदेश येथून अल्पवयीन भाचीचे (मेहूणीच्या मुलीचे) अपहरण करून तिला वेश्या व्यवसायात ढकलणाऱ्या एका ४० वर्षीय दलालाला ठाणे पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण शाखेने अटक केली आहे. त्याच्याविरोधात डिसेंबर महिन्यात उत्तरप्रदेश येथील पोलीस ठाण्यात मुलीच्या अपहरणाचा गुन्हा दाखल होता. या दलालाला १० मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलिसांनी त्याच्या तावडीतून भाचीचे आणि एका महिलेची सुटका केली आहे.

डायघर येथील गोठेघर फाटा परिसरातील ढाब्यावर महिला आणि अल्पवयीन मुलींची फसवणूक करून त्यांना वेश्या व्यवसायात ढकलणारा दलाल येणार असल्याची माहिती ठाणे पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक चेतना चौधरी यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे, ठाणे गुन्हे अन्वेषण शाखेचे उपायुक्त अमरसिंह जाधव, साहाय्यक पोलीस आयुक्त धनाजी क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक चेतना चौधरी, पोलीस उपनिरीक्षक स्नेहल शिंदे, एन.डी. क्षीरसागर, साहाय्यक पोलीस उपनिरीक्षक दीपक वालगुडे, दीपक भोसले, पोलीस हवालदार किशोर पाटील, आर. यु. सुवारे, अंमलदार हर्षदा थोरात, पी.जी. खरात, पोलीस शिपाई उदय घाडगे यांच्या पथकाने ढाब्याच्या परिसरात सापळा रचला.

दरम्यान, तो आल्यानंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्याची चौकशी केली असता, त्याने तो कल्याण येथील राहणारा असून महिलांना वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडत असल्याची कबूली त्याने दिली. याप्रकरणात पोलिसांनी त्याच्या तावडीतून नवी मुंबई येथील एका महिलेची आणि त्याच्या १६ वर्षीय भाचीची सुटका केली. तसेच त्याच्या विरोधात शिळ डायघर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ९६, १४३ (१), १४३ (३) सह लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियमन २०१२ चे कलम १७ सह अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम १९९६ चे कलम ४ आणि ५ प्रमाणे गुन्हा दाखल झाला. पोलिसांनी त्याला अटक करून त्याची चौकशी केली असता, त्याने भाचीचे उत्तरप्रदेश येथून अपहरण केल्याची कबूली दिली. तसेच त्याच्याविरोधात तेथील दोहरीघाट पोलीस ठाण्यात १ डिसेंबर २०२४ ला अपहरणाचा गुन्हा दाखल असल्याचे समोर आले. त्याला न्यायालयात हजर करण्यात आल्यानंतर न्यायालयाने त्याला १० मार्च पर्यंत पोलीस कोठडी सुनावली असल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चेतना चौधरी यांनी सांगितले.

## आनंद दिघे यांच्या स्मारकाचा प्रकल्प गुंडाळला?
# ठाणे महापालिकेच्या अर्थसंकल्पात उल्लेखच नाही

**■ठाणे :** शिवसेनेचे ठाणे जिल्हा प्रमुख आनंद दिघे यांचे स्मारक उभारणीच्या प्रकल्पाला शुक्रवारी ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात स्थान देण्यात आलेले नाही. यामुळे गेल्यावर्षीच्या अर्थसंकल्पात घोषणा करूनही कागदावर असलेला हा प्रकल्प पालिकेने गुंडाळल्याचे स्पष्ट होत आहे. शिवसेनेचे दिवंगत ठाणे जिल्हा प्रमुख आनंद दिघे यांनी घराघरात शिवसेना पोहचविण्याचे काम केले. ठाणे जिल्ह्यात दिघे यांच्या नावाचे मोठे वलय होते आणि त्यांचे जिल्ह्यावर वर्चस्व होते. ते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे राजकीय गुरू होते.

आनंद दिघे यांचे निधन २००१ साली झाले. परंतु निधनानंतरही त्यांच्या नावाचा करिष्मा कायम आहे. प्रत्येक निवडणुकीत त्यांच्या नावाचा वापर होताना दिसून येतो. त्यांच्या जीवनावर आधारित धर्मवीर चित्रपटही प्रदर्शित झाला. दिघे यांचे ठाणे जिल्ह्यातील योगदान लक्षात घेऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री पदाच्या काळात ठाण्यामध्ये दिघे यांचे स्मारक उभारण्याचे निर्देश ठाणे महापालिकेला दिले होते. यानुसार, तत्कालीन आयुक्त अभिजीत बांगर यांनी गेल्यावर्षी म्हणजेच २०२४-२५ या वर्षाच्या अर्थसंकल्पात दिघे यांचे स्मारक उभारण्याची घोषणा केली होती. उपवन येथील महापौर निवास या वास्तुमध्ये आनंद दिघे यांचे स्मारक उभारण्याचे प्रस्तावित करत त्यासाठी ५ कोटी रुपयांचा निधीची तरतुद अर्थसंकल्पात करण्यात आली होती. मात्र, आयुक्त सौरभ राव यांनी शुक्रवारी सादर केलेल्या २०२५-२६ या वर्षाच्या अर्थसंकल्पात स्मारकाचा उल्लेखच केलेला नसून यामुळे हे स्मारक गुंडाळ्यात आल्याचे स्पष्ट होत आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई 400063 (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १03, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com